# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २१५ वा ❑ भारतीय सौर दिनांक २४ आश्विन शके १९४८, रविवार दि.१८ ऑक्टोबर २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य:निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## विदर्भाचा सांस्कृतिक आणि भावनिक ठेवा: भुलाबाई उत्सव

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

महाराष्ट्र ही संतांची, वीरांची आणि तितक्याच समृद्ध लोककलांची जन्मभूमी आहे. याच मातीतील विदर्भ आणि खानदेश या प्रांतांमध्ये अत्यंत उत्साहात साजरा होणारा, लहान मुलींच्या आणि महिलांच्या भावविश्वाचा आरसा असणारा पारंपरिक लोकोत्सव म्हणजे भुलाबाई. आपण जेव्हा या उत्सवाकडे मागे वळून पाहतो, तेव्हा या परंपरेत दडलेला निखळ आनंद, स्त्री मनाची स्पंदने आणि नात्यांची घट्ट वीण अधिकच मोलाची आणि अर्थपूर्ण वाटते. भाद्रपद अमावस्या म्हणजेच सर्वपित्री अमावस्या किंवा नवरात्रीच्या पहिल्या दिवसापासून ते कोजागिरी पौर्णिमेपर्यंत हा उत्सव मोठ्या दिमाखात रंगतो. ग्रामीण आणि निमशहरी भागातील समाजजीवनात या सणाला एक अत्यंत वेगळे असे सांस्कृतिक, भावनिक आणि सामाजिक महत्त्व प्राप्त झाले आहे. परंपरेनुसार आणि स्थानिक सोयीनुसार भुलाबाई बसवण्याचे दिवस वेगवेगळे असतात; काही ठिकाणी हा उत्सव संपूर्ण १ महिना चालतो, तर काही ठिकाणी १० दिवस किंवा दसऱ्याच्या मुहूर्तावर बसवून ५ दिवस साजरा केला जातो. पाटावर किंवा चौरंगावर भुलाबाई म्हणजेच साक्षात माता पार्वतीचे रूप आणि भुलोजी म्हणजेच भगवान महादेवाचे रूप यांच्या काळ्या मातीपासून बनवलेल्या अत्यंत सुबक मूर्ती स्थापन केल्या जातात. या मूर्तींना पारंपरिक अस्सल मराठमोळा साज चढवला जातो; भुलाबाईला नऊवारी साडी नेसवली जाते, तर भुलोजीला धोतर आणि रुबाबदार फेटा बांधला जातो. ही भुलाबाई म्हणजे सासरच्या जाचातून काही काळ मोकळी होऊन माहेरी आलेली लाडकी लेक आणि भुलोजी म्हणजे तिला नेण्यासाठी आलेला जावई, अशी या परंपरेमागील अत्यंत गोड आणि मानवी भावनांना साद घालणारी लोककल्पना आहे.

भुलाबाईच्या या उत्सवाचा खरा आत्मा म्हणजे सायंकाळच्या वेळी अंगणात मुलींनी आणि महिलांनी एकत्र येऊन गायलेली गाणी. ही गाणी म्हणजे केवळ शब्द नसून ती मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित झालेली स्त्री–जीवनाची लोकगाथाच आहे. ''पहिली गं भुलाबाई, देवाच्या नावानं...'' अशा सुरुवातीच्या गाण्यातून या परंपरेचे अत्यंत सुंदर आणि सात्त्विक दर्शन घडते. या गाण्यांची अनेक अभ्यासपूर्ण वैशिष्ट्ये आहेत; गाण्याची सुरुवातच ईश्वराला साथ मागून होते, ज्यामध्ये खंडोबा आणि हनुमंत यांसारख्या लोकदैवतांचे उल्लेख प्रामुख्याने येतात. हे तत्कालीन समाजजीवनातील लोकांचे श्रद्धास्थान आणि ग्रामदैवतांशी असलेली त्यांची अतूट नाळ दर्शवते. ''तांब्याभर पाण्याने न्हाऊ द्या, बोटभर कुंकू लावू द्या, हिरवी चोळी नेसू द्या...'' या अत्यंत साध्या वाटणाऱ्या ओळींमधून सासरच्या कठोर जबाबदाऱ्यांमधून थोडा वेळ मोकळी होऊन माहेरी आलेल्या लेकीचे लाड आणि तिच्या अत्यंत साध्या, निरागस अपेक्षा व्यक्त होतात. माहेरच्या माणसांकडून मिळणारे निखळ प्रेम हाच तिचा खरा दागिना असतो. ''आउले पाऊल वरुड गांव, वरुड गावचे ठासे ठुसे, दुरून भुलाबाईचे माहेर दिसे...'' या शेवटातून माहेर जवळ आल्यावर मुलीच्या मनात निर्माण होणारी हुरहुर, माहेरच्या ओढीचा आनंद आणि गावाच्या वेशीचे दृश्यात्मक वर्णन अत्यंत हुबेहूब आणि जिवंतपणे चित्रित झाले आहे. ही लोकगीते म्हणजे तत्कालीन स्त्रियांना आपल्या भावना, सुख–दुःख आणि सासर–माहेरच्या गमतीजमती मोकळेपणाने मांडण्यासाठी मिळालेले एक हक्काचे व्यासपीठच होते.

भुलाबाईच्या गाण्यांनंतर लहान मुलींचे सर्वात जास्त आकर्षण असते ते खिरापतीचे म्हणजेच प्रसादाचे. रोज संध्याकाळी गाण्यांचा फेर संपल्यावर एका बंद डब्यात आणलेली खिरापत ओळखण्याचा रंजक खेळ रंगतो. ''आली गं आली खिरापत आली, हुंगून पाहा, वासून पाहा...'' असे म्हणत खिरापत ओळखण्याचा हा खेळ केवळ मनोरंजनापुरता मर्यादित नसून, तो लहान मुलींच्या बुद्धिमत्तेला, तर्कशक्तीला आणि ज्ञानेन्द्रियांना नैसर्गिकरीत्या चालना देणारा असतो. यातून रोज नवीन गोडधोड पदार्थ बनवण्याची, ते वाटून खाण्याची आणि सर्वांसोबत आनंद वाटून घेण्याची सवयही लहान वयातच रुजते. या उत्सवाच्या निमित्ताने गावातील किंवा गल्लीतील मुली, महिला दररोज संध्याकाळी एका छताखाली एकत्र येतात. एकत्र गाणी म्हणणे, फेर धरणे यातून त्यांच्यातील सामुदायिक भावना आणि सामाजिक बांधिलकी खऱ्या अर्थाने वाढीस लागते. गाणी गाणे, यमक जुळवणे, मूर्ती सजवणे, रांगोळ्या काढणे यातून लहान वयातच मुलींना सादरीकरणाची आणि एकत्रित काम करण्याची सवय लागून त्यांच्या कलागुणांना मोठा वाव मिळतो.

हा उत्सव आणि निसर्गाचे चक्र यांचाही अत्यंत जवळचा संबंध आहे. हा उत्सव नेमका पावसाळा संपून शरद ऋतूच्या सुरुवातीला येतो, जेव्हा शेतीची कामे एका महत्त्वाच्या टप्प्यावर आलेली असतात आणि शेतकऱ्याच्या घरात नवीन धान्य आलेले असते. त्यामुळे निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा, मातीचे उपकार मानण्याचा आणि धान्याची समृद्धी साजरी करण्याचा हा एक मोठा लोकोत्सव आहे. कोजागिरी पौर्णिमा हा या उत्सवाचा शेवटचा आणि सर्वात भव्य, भावपूर्ण दिवस असतो. या दिवशी अंगणात ज्वारीच्या धांड्यांनी किंवा उसाच्या खोंडांनी एक सुंदर खोपडी म्हणजेच झोपडी तयार करून ती झेंडूच्या फुला–पानांनी सजवली जाते. या सजवलेल्या झोपडीत भुलाबाई आणि भुलोजींना मोठ्या थाटात बसवले जाते. या दिवशी घराघरात विशेषतः ३२ प्रकारच्या विविध पारंपरिक पदार्थांचा व फळांचा महानैवेद्य तयार करून तो सर्वांना वाटला जातो. रात्री उशिरापर्यंत जागरणाचा आणि गाण्यांचा कार्यक्रम रंगतो आणि त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी अत्यंत जड अंतःकरणाने, सासरी जाणाऱ्या लेकीला जसा निरोप दिला जातो, अगदी तशाच भावपूर्ण वातावरणात भुलाबाईचे विसर्जन केले जाते. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या आणि धकाधकीच्या जीवनशैलीत भुलाबाईसारखे मातीशी जोडलेले उत्सव दुर्मिळ होत चालले आहेत. परंतु, या उत्सवांचे संवर्धन करून, त्यातील लोकतत्त्वीय मूल्ये जपून ही समृद्ध लोकपरंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे ही आपल्या सर्वांची काळाची गरज आणि मोठी सांस्कृतिक जबाबदारी आहे.

# ''माणूस जोडला गेला पाहिजे!''

## श्रमिकांचे कवी नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त विशेष व्याख्यान

मुंबई (प्रदिप बडदे) – दि. १४ ऑक्टोबर २०२६ रोजी साहित्य भारती, कोकण प्रांत नवी मुंबई शाखा आणि छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने विवेकानंद संकुल, सानपाडा येथे श्रमिकांचे कवी कवी नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रसिद्ध कवी व गीतकार श्री. प्रवीण दवणे हे प्रमुख व्याख्याते म्हणून लाभले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. नंदकिशोर जोशी सर, डॉ. अरुंधती जोशी मॅडम, संस्था प्रमुख सौ. उर्मिला जाधव मॅडम, साहित्य मंदिर वाशी प्रमुख श्री.सुभाष कुलकर्णी यांच्यासह अनेक मान्यवर, साहित्यप्रेमी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सरस्वती पूजन, ग्रंथपूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मराठी माध्यमिक विभागाच्या विद्यार्थिनींनी ईशस्तवन व स्वागतगीत सादर करून वातावरण मंगलमय केले. यावेळी छत्रपती शिक्षण मंडळ संस्थेच्या वारी, नवी मुंबई साहित्य परिषदेच्या शब्दसंवाद या साहित्यिक अंकाचे तसेच विद्यार्थ्यांनी कवी नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त तयार केलेल्या हस्तलिखिताचे प्रकाशन श्री.प्रवीण दवणे यांच्या हस्ते करण्यात आले. साहित्य क्षेत्रात योगदान देणाऱ्या साहित्यप्रेमींचा सन्मानही करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर नंदकिशोर जोशी यांनी त्यांच्या निवेदनातून प्रत्येकाच्या लेखणीला अधिक बळ मिळावे म्हणून साहित्याचे महत्त्व सुंदर शब्दात मांडले. डॉ. अरुंधती जोशी मॅडम यांनी नवरात्रीच्या दिवसात. स्त्री शक्तीचं महात्म्य आणि साहित्यातील सुंदर दाखले सादर केले. सौ.उर्मिला जाधव यांनी संस्थेच्या साहित्य विभागाअंतर्गत प्रकाशित अंक, घेतले जाणारे उपक्रम,कार्यक्रमाचा हेतू आपल्या प्रास्ताविकातून सांगितला. साहित्य




भारती कोकण प्रांत नवी मुंबई शाखा अध्यक्ष कल्पना देशमुख ह्यांनी साहित्य भारती कोकण प्रांत, नवी मुंबई येथे राबविण्यात येणारे उपक्रम या विषयीची माहिती दिली. प्रमुख मान्यवरांचा परिचय सौ.बापट मॅडम ह्यांनी करून दिला.

आपल्या ओघवत्या वक्तृत्वातून श्री.प्रवीण दवणे यांनी कवी नारायण सुर्वे यांच्या संघर्षमय जीवनाचा आणि साहित्यिक योगदानाचा हृदयस्पर्शी आढावा घेतला. ''संघर्षाशिवाय जीवन नाही. संघर्षातून मिळवलेल्या यशामुळेच जीवनाला खरा अर्थ प्राप्त होतो,'' हा विचार त्यांनी प्रभावीपणे मांडला. नारायण सुर्वे हे केवळ कामगार कवी नसून वैश्विक कवी होते, असे सांगताना त्यांनी त्यांच्या निवडक कवितांचे सुंदर दाखले दिले. आज उंच इमारती उभ्या राहत आहेत; मात्र माणसामाणसांतील नाती तुटत चालली आहेत, ही समाजाची शोकांतिका त्यांनी अधोरेखित केली. विद्यार्थ्यांना विठ्ठल आणि शाळेला पंढरी मानून त्यांनी शिक्षकांना मोलाचा संदेश दिला. आपल्या अध्यापनातून काही विद्यार्थ्यांचे जीवन समृद्ध झाले, तरी तीच खरी भारतमातेची सेवा आहे, असे प्रेरणादायी विचार त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचा समारोप करताना त्यांनी माणुसकीचा पूल बांधण्याची आणि माणसांना माणसांशी जोडण्याची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन संस्था साहित्य विभाग प्रमुख तथा प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका ,साहित्य भारती कोकण प्रांत नवी मुंबई कार्याध्यक्ष सौ. ऋतुजा गवस मॅडम यांनी केले, तर आभारप्रदर्शन संकुलप्रमुख तथा माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री.विलास वाव्हळ ह्यांनी केले. संघर्षाची जाणीव, साहित्याची प्रेरणा आणि माणुसकीचा संदेश देणारा हा कार्यक्रम सर्वांच्या मनावर अमिट छाप उमटवून गेला.

# जांभळा रंग : भक्ती, चैतन्य आणि वैभवाचे प्रतीक

**ज्योतिर्मय साहित्य**

शारदीय नवरात्र उत्सवातील आजचा रंग जांभळा रंग महत्त्वाचा मानला आहे.या दिवशी महागौरी देवीची पूजा केली जाते.हा दिवस दुर्गाष्टमी म्हणून देखील ओळखला जातो. दुर्गादेवीचा रौद्र अवतार असलेल्या देवीची पुजा केली जाते. तसेच या दिवशी देवीला तांबडी फुले, कमळ जास्वंद,कण्हेर किंवा गुलाबाच्या फुलांची माळ घातली जाते.या दिवसाचे नवरात्रौत्सवाच विशेष महत्त्व आहे.

नवरात्रीत जांभळा रंग हा अध्यात्म, भक्ती,आणि चैतन्याचे प्रतीक मानला जातो. निळा आणि लाल रंग मिसळल्यानंतर जांभळा रंग तयार होतो.त्यामुळे या रंगांमध्ये त्या दोन्हीही मूळ रंगाचे गुणदेखील समाविष्ट असतात.




म्हणून हा रंग निळ्या रंगाची शांतता,स्थिरता आणि लाल रंगाचा ऊर्जा,उत्साह यांचे प्रभाव स्थान मानला जातो.जांभळा रंग हा उच्च चेतना,आध्यात्मिक ऊर्जा आणि आत्मिक ज्ञानाची ओळख करून देतो.

जांभळा रंग हा चंचल मनाची एकाग्रता वाढवण्यास मदत करतो, आणि सकारात्मक विचार निर्माण करतो. मानसशास्त्रानुसार जांभळा रंग हा अध्यात्म,उच्च चेतना,बुद्धिमत्ता आणि अंतर्ज्ञानाचे प्रतीक मानला जातो.ध्यानधारणा आणि मानसिक संतुलनासाठी हा रंग उपयुक्त मानला असा ठरतो.

लोभस दिसणारा आणि हवाहवासा वाटणारा,चटकन डोळ्यात भरणार जांभळा रंग माणसाची कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलता वाढवण्यास मदत करतो.

फार पूर्वी किंवा प्राचीन काळामध्ये ज्यावेळी राजसत्ताक पद्धती अस्तित्वात होती,राजेशाही थाट होते. त्या काळी जांभळा रंग तयार करण्यासाठी वापरले जाणारे टायरियन पर्पल हे रसायन अत्यंत दुर्मिळ आणि महाग होते,त्यामुळे हा रंग केवळ राजा–महाराजा आणि उच्चभ्रू वर्गाशी जोडला गेला. अनेक प्रसिद्ध ब्रँड्स,ज्वेलरी,लोगो व पॅकिंगमध्ये या रंगाचा वापर करून उच्च गुणवत्ता आणि अभिजातता दर्शवली जाते.म्हणून हा जांभळा रंग राजस असा आहे.



© बलराज संघई
(एम.ए. अहिंसा शांति शोध)
छत्रपती संभाजीनगर
9420015108


# लखलख चंदेरी...

**ज्योतिर्मय साहित्य**

नभात चांदण्यांची आरास असावी. अंगणात दिव्यांची माळ असावी आणि प्रत्येकाच्या मनात आनंदाची ज्योत तेवत असावी, असं सुंदर चित्र डोळ्यांसमोर उभं राहतं, तेव्हा ओठांवर सहज शब्द येतात लखलख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया..

किती जुने गाणे आहे. त्याचा अर्थ, चाल, लय, ताल एक नंबर आहे. अजूनही आठवले की मन प्रसन्न होते आणि आपोआप आपणही त्या सुरात हरवतो. दिव्यांचा प्रकाश केवळ घर उजळत नाही, तर तो मनातही आशेचे किरण पेरत असतो .पेटता दिवा पाहिला की मन प्रसन्न होते. लखलखणाऱ्या पणत्या आपल्याला जगण्याचा सुंदर संदेश देतात. अंधार कितीही गडद असला, तरी एक छोटीशी ज्योत त्याला आव्हान देऊ शकते. पूर्ण अंधार असलेल्या खोलीमध्ये एक मिनमिनती पणती जरी लावली तरी पूर्ण घर उजळून टाकते. एवढीशी पणतीची ज्योत ती पूर्ण घर उजळून टाकण्याची ताकद तिच्यामध्ये असते. तिमिर नाहीसा करते आणि प्रकाशाची ज्योत पेटवते. तिमीराकडून तेजाकडे नेते.

अगदी त्याचप्रमाणे आयुष्यात कितीही संकटं आली, तरी मनात आशा, जिद्द आणि आत्मविश्वास असेल, तर आपण यशाचा मार्ग शोधू शकतो. संकटांचा सामना करू शकतो. आलेल्या संधीचा फायदा घेऊ शकतो.

चंदेरी प्रकाश म्हणजे केवळ चकाकी नव्हे; तर नात्यांमधील प्रेम, शब्दांमधील गोडवा, माणुसकीतील ओलावा आणि विचारांमधील निर्मळता होय. घरात दिवे लावणं सोपं आहे; पण एखाद्याच्या आयुष्यात आनंदाचा दिवा लावणं ही खरी माणुसकी आहे. आनंदाचा दिवा लावताना अगदी छोट्या छोट्या गोष्टीतून आपल्याला



आनंद मिळवता येतो आणि लोकांच्या चेहऱ्यावर आनंद बघायला मिळतो. बघा एखाद्या वृद्धाश्रमातील वृद्धांना वडापावची मेजवानी दिली तरी ते किती खुश असतात.

अनाथ मुलांना दिवाळीमध्ये कपड्यांचे वाटप केले तर त्यांचा आनंद गगनात मावत नाही.


लेखिका -
वसुधा वैभव नाईक,
पुणे. मो. 9823582116



दररोज काबाडकष्ट करणाऱ्या बायकांना जर आपण दिवाळीमध्ये छान नवीन साड्या घेऊन दिल्या तर त्यांचा चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहताना आपण पाहतो.हाच तो आनंदाचा दीप होय

एखाद्या अनाथाच्या चेहऱ्यावर हसू फुलवणं, दुःखी मनाला आधार देणं, निराश व्यक्तीला आशेचा किरण दाखवणं, अज्ञानाच्या अंधारात ज्ञानाची ज्योत पेटवणं, हीच खरी लखलख चंदेरी दुनिया असते..

आपण दिवाळीत घर स्वच्छ करतो, आकर्षक सजावट करतो; पण मनातील राग, द्वेष, मत्सर आणि अहंकारही दूर केले, तर जीवन अधिक सुंदर होईल. आपल्या शब्दांनी कुणाचं मन दुखावण्याऐवजी त्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलवता आलं, तर तोच खरा प्रकाशोत्सव साजरा होईल.

चला तर मग, आपल्या कर्तृत्वाने, प्रेमाने, साहित्याने, समाजसेवेने आणि सेवाभावाने जग उजळवूया.प्रकाशमान दीप पेटवूया.

आपल्या हातातील एक छोटीशी ज्योत दुसऱ्याच्या हातात देऊया. कारण प्रकाश वाटल्याने तो कमी होत नाही, उलट त्याचा उजेड अधिकच वाढतो. ज्ञानाचा दीप घरोघरी लावावा तसे प्रकाशासाठी दीप हातोहाती सोपवावा.

लखलख चंदेरी प्रकाशात केवळ अंगणच नव्हे, तर माणसामाणसांतील नातीही उजळायला हवी आहेत.

लखलख चंदेरी
नभात चांदणी
अंगणी उतरली
प्रकाशाची राणी...

पणत्यांच्या ज्योती,
सोनेरी सजला साज,
आनंदाने दीप नटला
दिवाळ सण आज...

दिवा एक प्रेमाचा,
नात्यांसाठी लावावा
दिवा एक मायेचा
आप्तांसाठी ठेवावा..

नको कुणाच्या मनात
दुःखाचा कधीच अंधार
नको या नात्यांमध्ये
दुराव्याची भिंत अपार...

स्नेहाच्या धाग्यांनी
नाती मनात गुंफूया
प्रेमाच्या प्रकाशात
जग सारे उजळूया...
लखलख चंदेरी दुनिया
स्वप्नांची फुलते पहाट
सुखाची बरसात होते
आनंदाची मिळते वाट....

प्रत्येक मनात एक दीप तेवू दे प्रत्येक ओठांवर हास्य फुलू दे, लखलख चंदेरी या प्रकाशपर्वात, प्रेमाचा सुगंध जगभर दरवळू दे....



# जात्यावरच्या ओव्या......

माय माऊलीची माया
नही बाजारपेठेत
आला दाटून गळा
लई दिसाच्या भेटीत ||८९५||

माय माऊलीची माया
नही वाण्याच्या दुकानी
कपाळाचा घेते मुका
लेक पहाडावानी ||८९६||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७८

ज्योतिर्मय साहित्य

**अहो ज्या नरा रामविश्वास नाही ।**
**तया पामरा बाधिजे सर्व काही ।**
**महाराज तो स्वामी कैवल्यदाता ।**
**वृथा वाहने देहेसंसारचिंता ।।७८।।**

अर्थ : ज्या मनुष्याचा परमेश्वरावर विश्वास नाही, त्या माणसाला ( पामराला ) सर्व प्रकारची संकटे त्रास देतात. भगवंत महाराज म्हणजे राजांचा राजा आहे, या विश्वाचा स्वामी म्हणजे मालक आहे, तो कैवल्यदाता म्हणजे मोक्ष देणारा आहे. असा हा सर्वशक्तिमान परमेश्वर आपली काळजी वाहण्यास समर्थ असताना आपण उगाच देहाची आणि संसाराची चिंता करीत बसतो.

( पामर - क्षुद्र /हीन /दीन / दुबळा, बाधणे - त्रास होणे, कैवल्यदाता - मोक्ष देणारा, वृथा - व्यर्थ )




विवेचन : आधीच्या श्लोकात समर्थांनी श्रीरामावर निष्काम श्रद्धा ठेवून त्याचे नामस्मरण केल्यास मनातील द्वंद्व नाहीसे होते. सर्व जीवांच्या मध्ये तो एकच परमात्मा व्यापून राहिला आहे असा साक्षात्कार होतो असे सांगितले आहे. या श्लोकात ज्याचा रामावर विश्वास नाही अशा माणसाचा खरपूस समाचार समर्थ घेतात. अशा माणसाला ते पामर म्हणतात. पामर म्हणजे क्षुद्र, हीन. गरीब आणि पामर यात फरक करता येतो. गरीब माणूस आपल्या कर्तृत्वाने स्वतःची उन्नती करून घेऊ शकतो. परंतु हा त्या दृष्टीने महामूर्खच म्हणावा लागेल. कारण आपले हित कशात आहे हे त्याला कळत नाही. ज्यांची परमेश्वरावर श्रद्धा नाही, अशा माणसांना समर्थ पामर म्हणतात. मग तो ऐहिक दृष्ट्या भलेही श्रीमंत असेल, पण पारमार्थिक दृष्ट्या अभागी आणि हीन दीन.

असा माणूस आर्थिक दृष्ट्या भलेही सधन असेल पण प्रपंचात




येणाऱ्या संकटांनी तो खचून जातो. प्रपंचातील संकटांचे तडाखे भल्याभल्यांना सोसवत नाहीत. छोट्यामोठ्या गोष्टींनीही अशी माणसे विचलित होतात. समर्थांच्या शब्दात सांगायचे तर अशा माणसांना संसार आणि त्यातील अडचणी बाधक ठरतात. पण ज्यांची रामावर श्रद्धा आहे, अशा माणसांना प्रपंचातील संकटे विचलित करीत नाहीत. त्यांना संकटे येत नाहीत असे नाही. पण भगवंतावर सर्व भार टाकल्यामुळे त्यांना अशा गोष्टींचा त्रास होत नाही.

या श्लोकात भगवंताच्या गुणांचे वर्णन करताना समर्थ तीन विशेषणे वापरतात. तो महा राज आहे, स्वामी आहे आणि कैवल्यदाता आहे. महाराज म्हणजे महान राजा. राजांचा राजा. रामराज्य होऊन आज हजारो वर्षे लोटली तरी रामराज्याची कल्पना आजही लोकांना भावते. रामराज्य म्हणजे आदर्श राज्य होते. राम हा आदर्श राजा. दुसरी गोष्ट म्हणजे तो या चराचराचा स्वामी आहे. इंग्रजी शब्द वापरायचा तर तो सुप्रीम पॉवर आहे. या विश्वाचा निर्माता, पालनकर्ता आणि संहारकर्ता तोच आहे. तिसरी गोष्ट म्हणजे तो कैवल्यदाता आहे. कैवल्यदाता म्हणजे मुक्ती किंवा मोक्ष देणारा. ज्याने ज्याने रामनाम घेतले, तो तरून गेला. मग तो वाल्या कोळी असेल, भक्त प्रल्हाद असेल, रामनाम घेणारी शबरी असेल किंवा अहिल्या असेल. हनुमंत आणि बिभीषण हे रामाचे भक्त तर चिरंजीव झाले. **(क्रमशः)**




# ।। संजय उवाच... ।।



@संजय काव्या पुणे 7743918559

✍️श्रीमंती

श्रीमंती म्हणजे केवळ हातात असलेला भरपूर पैसा नव्हे, तर संपत्तीची, साधनांची किंवा चांगल्या गोष्टींची विपुलता होय. मनःशांति व समाधान - रोज रात्री शांत झोप लागणे आणि सकाळी उत्साहाने उठणे. नातेसंबंध - कुटुंबातील प्रेम, आदर, आपुलकी आणि उत्तम मित्रपरिवार लाभणे. जगण्यासाठी किंवा संकटाच्या प्रसंगी दुसऱ्यासमोर हात पसरवण्याची वेळ न येणे. ही खरी श्रीमंती आहे.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

# नाम आणि सत्कर्म



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नाम हा सत्कर्माचा पाया आहे तसाच कळसही आहे. भगवंताच्या स्मरणात केलेले कर्मच सत्कर्म या सदरात पडू शकते; भगवंताच्या विस्मरणात केलेले कर्म सत्कर्म ठरू शकत नाही. समजा, एखादा मनुष्य नुसते तोंडाने 'राम, राम' म्हणतो आहे परंतु भगवंताच्या स्मरणात नाही, तर मग 'राम, राम' म्हणण्याची त्याची क्रिया सत्कर्म म्हणता येईल का ? वास्तविक, नाम हे स्वत:सिद्ध असल्याने ते जाणता वा अजाणता म्हटले तरी ते सत्कर्म याच सदरात पडते, कारण 'जेथे माझे नाम तेथे मी पुरुषोत्तम' असे भगवंताचेच वचन आहे. म्हणून नामाचा उच्चार आणि भगवंत या दोन गोष्टी निराळ्या असूच शकत नाहीत. मुखाने नाम म्हणणाऱ्याचे लक्ष भगवंताकडे असो वा नसो, ते सत्कृत्य याच सदरात पडते. इतर कर्मे आणि नाम घेण्याचे कर्म यांत जो मोठा फरक आहे तो हाच की, इतर कर्मांना पूर्णत्व किंवा सत्यत्व नामाने येते, तर उलटपक्षी नाम आणि अपूर्णत्व या गोष्टी एकत्र संभवतच नाहीत. म्हणून नाम भगवंताच्या स्मरणात घेतले किंवा कसे हा प्रश्नच उद्भवत नाही. किंबहुना, नाम मुखी आले की सत्कर्मे होऊच लागतात. मूल झाले की मुलाच्या आईला पान्हा फुटणे, मुलाचे लाड करणे, त्याच्यावर सर्वतोपरीने प्रेम करणे, या गोष्टी जशा न शिकविता सहजच होतात, तशीच स्थिती नाम घेणाऱ्याची सत्कर्माच्या बाबतीत होते. इतकेच नव्हे तर, त्या आईला जर म्हटले की तू मुलाला जवळ ठेव, पण त्याच्यावर प्रेम वगैरे काही करू नकोस, तर ते जसे तिला शक्य नाही, त्याचप्रमाणे नाम घेणाराला सत्कर्मे टाळू म्हटले तरी टाळता येणार नाहीत. सत्कर्मे फळाला आली असे केव्हा म्हणता येईल, तर भगवंताचे नाम मुखी येईल तेव्हाच.

परमात्म्याने आपल्याला सांगून ठेवले आहे की, '' तू माझा व्हावास असे तुला वाटते आहे ना ? मग तू प्रपंच अती दक्षतेने कर, प्रयत्नाला कधी मागे पाहू नकोस, पण फळ देणारा मी आहे ही भावना ठेवून तू वाग. जी परिस्थिती येईल त्यात समाधान बिघडू देऊ नकोस, आणि मी जे सांगतो ते औषध घे, ते तुला सर्व रोगांतून मुक्त करील; आणि ते औषध जर कोणते असेल तर ते माझे ' नाम ' हे होय. '' त्या नामाचा खरोखर तुम्ही अभ्यास करा. तुम्ही सर्वांनी असा निश्चय करा, की नामाशिवाय जगणे हे खरे नाही. नामाशिवाय जगू नये असे मला खरोखर मनापासून वाटते. नामावरची निष्ठा कसे काम करते हे निष्ठेने नाम घेणारालाच कळेल. नामाचे प्रेम ज्याला लागले त्याच्या मागे परमात्मा उभा राहिला हे अगदी सत्य, सत्य, त्रिवाचा सत्य सांगतो. म्हणून आवडीने आणि प्रेमाने भगवंताचे नाम घ्या, एकदा तरी त्याला कळकळीने 'रामा! ' अशी हाक मारा, की भगवंताला तुम्हाला येऊन भेटावेसे वाटले पाहिजे.

सत्कर्माचा शेवट भगवंताच्या नामाचे प्रेम उत्पन्न होण्यातच होणे जरूर आहे.

***

# ।। अध्यात्म ।।

मधुकर बोरीकर, पुणे

## आपले सण, आपले उत्सव शारदीय नवरात्र

पूजना पूर्वी, मातेस प्रार्थना करावी की, हे माते, मी नवरात्र व्रत करू इच्छितो. या कार्यात कृपा करून आपण सहाय्यभूत व्हावे. पुष्प धूप दीप इत्यादींनी पूजन करावे. अर्घ्य द्यावे. फळांचा नैवेद्य अर्पण करावा, व होम हवन करावे.

■ आपल्याकडील नवरात्राची प्रथा

आपल्या कडे नवरात्रात देव घरा जवळच, रानातील माती आणून त्याचा छोटासा डोंगर तयार करतात. त्या डोंगरावर एका ताम्हनात मातेचा तांदळा ठेवतात. त्या मातीवर गहू तांदूळ पेरतात. पूजा करताना दररोज मातेला एक माळ अर्पण केल्या जाते. माते पुढे अखंड नंदादीप तेवत ठेवण्यात येतो. सकाळ संध्याकाळ देवीच्या मनोभावे आरत्या म्हणण्यात येतात. अशा प्रसंगी घरातील सर्व अबाल वृद्ध भक्ती भावाने या आरतीत सम्मीलीत होतात. प्रसादाचे वाटप होते व हा प्रसाद विनम्रतेने लोक ग्रहण करतात.

■ भूमीवर शयन

आपल्या घरात प्रत्यक्ष माता भगवती वास्तव्यास आली आहे, म्हणून तिच्या आदरा प्रित्यर्थ या नवरात्राच्या काळात केवळ भुमी वरच शयन करावे पलंगाचावापर करू नये. अनेक लोक या काळात पायात पादत्राणे घालत नाहीत,व दाढी कटिंग ही या काळात करत नाहीत.

# सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍️वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

## "स्वकर्तृत्वावर ठाम राहा"

मित्रांनो आणि वाचकहो, असे कोणतेही आईवडील नसतील ज्यानी आपल्या वयात येत असलेल्या किंवा नुकतेच लग्न झालेल्या मुलांना "स्वकर्तृत्व व जबाबदारीचे धडे "किंवा दोन ऊपदेशपर शब्द सांगितले नसतील. मुले ऐकू न ऐको, परिस्थिती सधन असो वा गरिब आईवडील सांगतात ते कधीच चूक ठरणार नाही! मी ईथे एका लग्न झालेल्या मुलाचे, आणि त्याच्या आईवडीलाचे संभाषण एक सार्वजनिक उदा.म्हणून देत आहे. बघा हे आपण घरी दारी मित्राकडे ऐकले असेल.. एक्स म्हणतो, बाबा तुम्ही काही कमावून ठेवले नाही. त्याची पत्नी, दुसर्याचे वडील किती कमावून ठेवतात !आमच्या नशिबी मात्र दारिद्र!एक्स आई,आमच्यासाठी तुच मोठी इस्टेट आहे.आम्ही बेताच्या परिस्थितीत तुझं सगळं केल बघ.आणि तु असं बोलतोस.आम्ही काहीच केल नाही म्हणतोस?मग तू करून दाखव इस्टेट तुझ्या मुलासाठी. मुलाला आपली चूक लक्षात आली. आई म्हणाली, बेटा, तणावाच्या काळात माणूस चिडचिड करतो, आपला विवेक, नम्रता धीर हरवू नये पण एक गोष्ट कायम लक्षात ठेव.आपल्या अपयशाचे खापर कधी दुसर्याच्या डोक्यावर फोडायचे नसते. स्वाभिमान व सचोटीने जगायचे. स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवायचा आणि कष्टाला करी कमी पडायचे नाही.परिस्थितीशी दोन हात करायची तयारी ठेवायची." तर असे संवाद घरोघरी चालतात.मित्रांनो, आई वडिलांनी मागे ठेवलेली खरी इस्टेट म्हणजे केवळ पैसा किंवा मालमत्ता नसते; त्यांनी दिलेले संस्कार, शिक्षण कष्टाची सवय आणि संकटातही न डगमगण्याची हिंमत हिच आयुष्यभर साथ देणारी सर्वांत मोठी संपत्ती असते! आज एवढे पुरे गुड डे व्हेरी गूड़ मार्निग आणि ईथे थांबतो आपण वाचत राहा सुख दुःखाचे तरंग माणसा - माणसाचे.सुप्रभात



# लिंबूचे आयुर्वेदिक फायदे

ज्योतिर्मय साहित्य

लिंबात व्हिटॅमिन-सी चे प्रमाण खूप जास्त असते. हे शरिरासाठी अँटिऑक्सिडंट म्हणून कार्य करते, जे मुक्त रॅडिकल्सला तटस्थ करते. व्हिटॅमिन-सी मुळे हृदयविकार, पक्षाघात आणि कमी रक्तदाबाचा धोकाही कमी होतो. सरासरी आकाराच्या लिंबाच्या रसात ३१ पर्यंत व्हिटॅमिन-सी असते, तर प्रौढ व्यक्तीला दररोज ६५ ते ९० व्हिटॅमिन-सी आवश्यक असते.



वजन घटवण्यात मदत करतो : लिंबूत असलेले पॉलीफेनॉल अँटीऑक्सिडंटमध्ये वजन कमी करण्याचे गुणधर्म आहेत. लिंबूत असलेले अँटिऑक्सिडंट्स रक्तातील ग्लुकोजची पातळी कमी करून इन्सुलिन प्रतिरोधक क्षमता सुधारू शकतात. या दोन्ही गोष्टी टाईप-२ मधुमेहाचे मुख्य कारण मानल्या जातात.

त्वचा सुधारते : लिंबूत असलेले व्हिटॅमिन-सी हे त्वचेवरील सुरकुत्या कमी करते. तसेच, त्वचेचा एजिंग पासून (वृद्धत्वापासून) बचाव करते आणि उन्हामुळे होणाऱ्या नुकसानापासून त्वचेचे रक्षण करते.

पचनक्षमता मजबूत होते : बद्धकोष्ठतेपासून आराम मिळावा यासाठी सकाळी लिंबू पाण्याचे सेवन करावे. कोमट पाण्यात लिंबू मिसळून प्यायल्याने पचनक्रिया सुधारते. लिंबू पाण्याने पचनक्रिया सुधारते.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

नैसर्गिक ब्रेथ फ्रेशनर : अनेक वेळा लसूण, कांदा किंवा मासे खाल्ल्यानंतर तोंडाला दुर्गंधी येते. लिंबू पाणी प्यायल्याने श्वासाच्या दुर्गंधीची समस्या दूर होते. तसेच लिंबू लाळ उत्तेजित करते.

*मुतखड्याच्या आजारात मदत होते* : लिंबात असलेले सायट्रिक ॲसिड मुतखड्याचा धोका कमी करू शकते. सायट्रिक ॲसिड मध्ये सायट्रेट नावाचे संयुग असते, जे लहान लहान मुतखड्याचे स्टोन्स फोडण्यास मदत करते.

ॲनिमियापासून बचाव करते : लोहाच्या कमतरतेमुळे होणारा अशक्तपणा म्हणजेच ॲनिमिया हा एक अतिशय सामान्य आजार आहे. जेव्हा एखाद्या व्यक्तीला अन्नात पुरेसे लोह मिळत नाही, तेव्हा याचा त्रास होतो. लिंबूत काही प्रमाणात लोह असते.

हृदयाला हेल्दी ठेवते : जर एक लिंबू संपूर्ण खाल्ले तर शरिराला ५२% व्हिटॅमिन-सी मिळू शकते. लिंबूपाणी प्यायल्याने व्हिटॅमिन-सी भरपूर प्रमाणात मिळते. व्हिटॅमिन-सी मुळे हृदयविकार आणि स्ट्रोक्सचा धोका कमी होतो. तसेच, लिंबूत असलेले फायबर आणि प्लांट कंपाऊंड देखील हृदयविकाराचा धोका कमी करण्यासाठी फायदेशीर ठरतात.

# प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

## कात्यायनी

नवरात्रीच्या सहाव्या दिनी
कात्यायनीची पूजा करुन
मातेस नमन करावे
महर्षी कात्यायनाने देवीची
सर्वप्रथम पूजा केल्याने
देवीला कात्यायनी संबोधावे

कात्यायनी मातेचे रूप
अत्यत तेजःपुंज असून
चारा भुजा आहेत
हाती अभयमुद्रा,वरमुद्रा,
तलवार,कमळाचे फूल
भक्तजन आनंदे पाहेत

# हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक

**आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचे प्रश्न सोडविण्यासाठी तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे प्रशासनाला निर्देश; कर्मचाऱ्यांना न्याय देण्याचे आश्वासन**

**ज्योतिर्मय साहित्य**

मुंबई / पुणे – हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या विविध मागण्यांसंदर्भात आरोग्य सेवा कर्मचारी महासंघ (संलग्न : भारतीय मजदूर संघ) यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. संघटनेच्या वतीने वारंवार सादर करण्यात आलेल्या निवेदनांची दखल घेऊन महाराष्ट्राच्या आरोग्य राज्यमंत्री मा. श्रीमती मेघना बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस आरोग्य सेवा कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब भुजबळ, सरचिटणीस श्री. अरुण नक्षीने, उपाध्यक्ष श्री. भास्कर कढाईतकर व श्री. निवृत्ती मस्के, प्रदेश चिटणीस श्री. प्रभाकर वाघ तसेच भारतीय मजदूर संघाचे प्रदेश महामंत्री श्री. किरण मिलगीर उपस्थित होते.

शासनाच्या वतीने आरोग्य सेवा विभागाचे संचालक श्री. कुंदेवाड, सहसंचालक श्री. सांगळे, अवर सचिव श्रीमती श्वेता सावरीकर व उपसचिव श्रीमती अस्मिता जोशी यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. तसेच श्री. चेतन भोजकर, समन्वयक, आरोग्य विभागाचे सचिव श्री. काटकर आणि श्री. महेश पोहनेरकर यांनीही बैठकीत सहभाग घेतला.

**हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्या मांडल्या**

बैठकीत संघटनेच्या प्रतिनिधींनी



हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या महत्त्वाच्या मागण्या राज्यमंत्री महोदयांसमोर मांडल्या. त्यामध्ये प्रामुख्याने पुढील मागण्यांचा समावेश होता.

१. सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी: सन २००६ ते २०१२ या कालावधीतील सहाव्या वेतन आयोगानुसार देय असलेला वेतनफरक तातडीने अदा करावा.

२. सेवेत समावेशन :अनेक वर्षांपासून सेवा बजावणाऱ्या हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांचे एकवेळची विशेष बाब म्हणून सेवेत समावेशन करण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा.

३. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन : सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना पेन्शन सुरू करण्याबाबत योग्य कार्यवाही करावी.

४. अनुकंपा तत्त्वावर नोकरी : सेवेत असताना मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पात्र वारसांना अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्याची कार्यवाही करावी.

हे कर्मचारी अनेक वर्षांपासून शासनाच्या आरोग्यविषयक कामकाजात योगदान देत असूनही त्यांच्या मूलभूत सेवा व आर्थिक प्रश्नांवर अद्याप निर्णय झालेला नाही. त्यामुळे या प्रश्नांमध्ये शासनाने तातडीने हस्तक्षेप करून कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अशी आग्रही मागणी श्री. किरण मिलगीर व श्री. बाळासाहेब भुजबळ यांनी केली.

**राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचे प्रशासनाला निर्देश**

संघटनेच्या मागण्यांची दखल घेत राज्यमंत्री श्रीमती मेघना बोर्डीकर यांनी संबंधित प्रशासनाला प्रलंबित प्रश्नांबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. संघटनेने मांडलेल्या मागण्यांसंदर्भात आवश्यक प्रस्ताव लवकरात लवकर सादर करावेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच आर्थिक बाबी आणि मुख्यमंत्री महोदयांच्या स्तरावर निर्णय घेणे आवश्यक असलेल्या प्रश्नांसंदर्भात आपण स्वतः मुख्यमंत्री महोदयांची भेट घेऊन कर्मचाऱ्यांच्या समस्या त्यांच्या निदर्शनास आणून देऊ. हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासन सकारात्मक प्रयत्न करेल, असे ठोस आश्वासन त्यांनी संघटनेच्या प्रतिनिधींना दिले.

याशिवाय, प्रलंबित प्रश्नांवर पुढील बैठक लवकरात लवकर घेऊन शासनाच्या स्तरावरील प्रलंबित बाबींवर ठोस निर्णय घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

**कर्मचाऱ्यांना न्याय मिळेपर्यंत पाठपुरावा सुरूच राहणार**

हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर विशेष लक्ष देऊन बैठक आयोजित केल्याबद्दल भारतीय मजदूर संघाचे प्रदेश महामंत्री श्री. किरण मिलगीर व आरोग्य सेवा कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब भुजबळ यांनी राज्यमंत्री श्रीमती मेघना बोर्डीकर तसेच शासनाचे आभार मानले.

वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या या प्रश्नांवर लवकरात लवकर ठोस निर्णय घेऊन शोषित, वंचित व पीडित कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच बैठकीस उपस्थित असलेल्या सर्व अधिकारी व प्रतिनिधींचे श्री. बाळासाहेब भुजबळ यांनी आभार मानले.

हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांची पूर्तता होऊन त्यांच्या सेवाविषयक व आर्थिक प्रश्नांना कायमस्वरूपी न्याय मिळावा, यासाठी आरोग्य सेवा कर्मचारी महासंघ व भारतीय मजदूर संघाचा पाठपुरावा यापुढेही सुरू राहणार आहे असे मनोगत सचिन मेंगाळे उपाध्यक्ष भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश यांनी व्यक्त केले आहे.



# १७ वर्षांखालील मुलांच्या संघाची उल्लेखनीय कामगिरी; जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेत स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाचा संघ उपविजेता

**ज्योतिर्मय साहित्य**

जळगाव (गोकुळसिंग राजपूतगाव)– जिल्हास्तरीय शालेय क्रिकेट स्पर्धेत स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या १७ वर्षांखालील मुलांच्या क्रिकेट संघाने उत्कृष्ट कामगिरी करत उपविजेतेपद पटकावले. संघातील खेळाडूंनी आपल्या कौशल्याच्या जोरावर स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली. या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या संघाचे नेतृत्व वंश अग्रवाल याने केले, तर सार्थक झावर याने यष्टीरक्षकाची जबाबदारी सांभाळली. संघात विशाल कुंभार, राज पाटील, अतुल राठोड, चेतन महाजन, मनीष ढाके, मोहित माने, पियुष सूर्यवंशी, मानस निकम, कृष्णा डोहाळे, प्रेमसिंग पाटील, जयेश पाटील, जय अहिरे, वरुण रायपुरे आणि आर्यन बिराडे या खेळाडूंचा समावेश होता.

या खेळाडूंना महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक डॉ. रणजीत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी सराव आणि सांघिक समन्वयाच्या बळावर स्पर्धेत चांगली कामगिरी केली.

संघाच्या या यशाबद्दल एम.जे. स्वायत्त महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. केतन नारखेडे, के.सी.ई. सोसायटी कनिष्ठ महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. आर. बी. ठाकरे, प्रा. स्वाती बऱ्हाटे, उपप्राचार्य प्रा. राजश्री महाजन, पर्यवेक्षिका प्रा. शिल्पा सरोदे, कला व वाणिज्य शाखेचे समन्वयक प्रा. उमेश पाटील, विज्ञान शाखेचे समन्वयक प्रा. गुणवंत वंजारी आणि जिमखाना समितीच्या चेअरमन प्रा. वर्षा पाटील यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

यावेळी सर्व मान्यवरांनी खेळाडूंच्या कामगिरीचे कौतुक करून त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# अल्का साखरे यांना संविधान सन्मान प्रज्ञावंत साहित्य पुरस्कार जाहीर

**ज्योतिर्मय साहित्य**

छ. संभाजीनगर – विश्वबंधुता साहित्य परिषद पुणे या साहित्य क्षेत्रातील नामांकित संस्थेच्या वतीने दरवर्षी साहित्य क्षेत्रात योगदान देणाऱ्या कवी, कवयित्री यांची योग्य ती निवड करून त्यांना हा पुरस्कार दिला जातो. यावर्षी सुद्धा संविधान सन्मान प्रज्ञावंत साहित्य पुरस्कार २०२६ चा छ. संभाजीनगर येथील शिक्षिका व सुप्रसिद्ध कवयित्री अल्का धोंडणे– साखरे यांना जाहीर झालेला आहे. येत्या २६ नोव्हेंबरला पुणे येथे संस्थेतील मान्यवरांच्या हस्ते त्यांना




पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात येणार आहे. असे सस्थेचे संस्थापक बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांनी अल्का साखरे यांना पत्राद्वारे कळवले आहे. अल्का साखरे ह्यांचा मैत्री कट्टा कवीमनाचा साहित्यिक समूह असून या संस्थेतर्फे आतापर्यंत चार राज्यस्तरीय साहित्य संमेलन घेण्यात आले आहे. तसेच या संस्थेतर्फे स्पंदन चारोळी संग्रह, काव्यओंजळ प्रातिनिधिक कवितासंग्रह व दीपोत्सव मैत्रीचा दिपावली विशेषांक प्रकाशित करण्यात आले आहे. प्रीतगंध व प्रभातपुष्प हे दोन स्वलिखित कवितासंग्रह व सुविचार संग्रह प्रकाशित झालेले आहे. यापूर्वी रमाई गौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. अल्का साखरे यांना मानाचा पुरस्कार जाहीर झाल्याचे कळताच शैक्षणिक, साहित्यिक क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.




**सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....**



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.
सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

**Dr Shaikh A H - 98606 99906**



# श्रीरामरक्षास्तोत्र

## मराठी भावानुवाद सहीत

**भावानुवादकार - माधव मनोहर जोशी.**

✍श्रीरामचन्द्रचरणौ मनसा स्मरामि ।
श्रीरामचन्द्रचरणौ वचसा गृणामि ॥
श्रीरामचन्द्रचरणौ शिरसा नमामि ।
श्रीरामचन्द्रचरणौ शरणं प्रपद्ये ॥३०॥
➡ मराठी भावानुवाद ---
मनोमनी स्मरतो मी श्रीराम चरण
वाणीने मी करतो त्यांचे गुणवर्णन
श्रीरामास करतो शिरसाष्टांग नमन
अन् प्रभू श्रीरामास जातो मी शरण ॥३०॥
✍माता रामो मत्पिता रामचन्द्रः।
स्वामी रामो मत्सखा रामचन्द्रः॥
सर्वस्वं मे रामचन्द्रो दयालुः ।
नान्यं जाने नैव जाने न जाने ॥३१॥
➡ मराठी भावानुवाद ---
राम माझी माता,तोच माझा पिता
तोच माझा बंधू, तोच माझा सखा
दयाळू श्रीराम असे सर्वस्व माझे
दुजा ना कोणी मम मनी विराजे ॥३१॥
✍दक्षिणे लक्ष्मणो यस्य वामेतु जनकात्मजा
पुरतो मारुतीर्यस्य तं वंदे रघुनंदनं ।।३२।।
➡मराठी भावानुवाद -----
लक्ष्मण असे जयाच्या उजवीकडे
अन जनकतनया सीता डावीकडे
सामोरी असे जयाच्या श्री हनुमान
अशा रघुनंदनास करितो मी नमन ।।३२।।
✍लोकाभिरामं रणरंगधीरं, राजीवनेत्रं रघूवंशनाथम्
कारुण्यरूपम् करूणाकरन्तम्, श्रीरामचंद्रम् शरणं प्रपद्ये ।।३३।।
➡ मराठी भावानुवाद ----
रणांगणी जो असे शांत, अन करी सकलांस प्रसन्न
जो असे रघूवंशनाथ,अन असे जयाचे राजीवलोचन
जो करी सकलांवर दया, अन असे करुणा निधान
ऐशा त्या प्रभू श्रीरामचंद्रास,मी नित्य जातसे शरण ।।३३।।
✍मनोजवं मारुततुल्य वेगम् , जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्
वातात्मजम् वानरयूथ मुख्यम् श्रीराम दूतम् शरणं प्रपद्ये ।।३४।।
➡ मराठी भावानुवाद ---
विद्वानांत श्रेष्ठ, वायू वेग असे जयाचा
मनानुसार असे ताबा इंद्रियी तयाचा
हा असे पवनपुत्र अन वानर सेनानी
रामसेवक मारुतीस मी शरण मन्मनी ।।३४।।
✍कूजन्तं रामरामेति मधुरं मधुराक्षरम् ।
आरुह्य कविताशाखां वन्दे वाल्मीकिकोकिलम्॥ ३५॥
➡ मराठी भावानुवाद ---
वाल्मिकीरुपी कोकिळ,काव्याच्या फांदीवर बसून
करितो राम राम ऐशा मधुर अक्षरांचे कूजन
अशा त्या महान वाल्मिकीरुपी कोकिळेस
मी करितो प्रेमभरे मनोभावे सादर वंदन ॥३५॥



# ॥ श्री गणेश चिंतन ॥

*समर्थ रामदास स्वामी कृपेने मनाचे श्लोक व दासबोधाच्या आधाराने "गणेश उत्सवात १० दिवस नियमित एक गणेश चिंतन करू या कारण "जो स्वतः शुभ झाला तोच शुभारंभ करू शकतो"*

**कृतज्ञ मी कृतार्थ मी, भगवंत हृदयस्थ आहे 🙏 अपर्णा परांजपे कात्रज पुणे**

कारण अमृताची संकल्पनाही देह आणि काळाच्या चौकटीत आहे.
पण–"सद्गुरुकृपा यथार्थ । अमर करी"
हे कोणते अमरत्व?शरीराचे नाही.जन्माला येणाऱ्या देहाला अमर करण्याचे आश्वासन समर्थ देत नाहीत.
तर जन्म-मृत्यूच्या पलीकडील आत्मस्वरूपाची ओळख हे येथे "अमरत्व" म्हणून समजणे अधिक योग्य.
हीच वेदान्तातील अमृतत्वाची दिशा आहे.
५. कल्पतरू – इच्छा पूर्ण करणारा; पण सद्गुरू?
सद्गुरूसी म्हणावें कल्पतरु । तरी हा कल्पनेतीत विचारु ।
कल्पवृक्षाचा अंगिकारु । कोण करी ॥२५॥
कल्पतरू म्हणजे इच्छापूर्ती.
पण सद्गुरू काय देतात?इच्छित वस्तू?नाही.
ते तर प्रश्नच बदलतात.
सामान्य मन म्हणते–"मला हे मिळावे."
सद्गुरूच्या ज्ञानाने प्रश्न होतो–"हे मिळवणारा 'मी' कोण?"
म्हणून समर्थ म्हणतात–"हा कल्पनेतीत विचारु"
सद्गुरू आपल्याला कल्पनेतील वस्तू देत नाहीत.
ते कल्पनेच्या पलीकडील सत्याकडे नेतात.
म्हणून कल्पतरूची उपमा कमी पडते.
६. चिंतामणी आणि कामधेनू
चिंता मात्र नाहीं मनीं । कोण पुसे चिंतामणी ।
कामधेनूचीं दुभणीं । नि:कामासी न लगती ॥ २६॥
ही ओवी मला या संपूर्ण समासातील अत्यंत सुंदर ओव्यांपैकी एक वाटते.
चिंतामणी – इच्छा पूर्ण करणारा.
कामधेनू – अपेक्षित सर्व काही देणारी.
पण ज्याच्या मनात–"चिंता मात्र नाहीं मनीं"
त्याला चिंतामणीची गरज काय?
आणि–"नि:कामासी न लगती"
ज्याला काही मागायचेच उरले नाही, त्याला कामधेनूच्या दूधाचीही आवश्यकता नाही.इथे सद्गुरुकृपेचा एक विलक्षण परिणाम सूचित होतो –सद्गुरू आपल्याला इच्छांची अनंत यादी देत नाहीत; ते "इच्छिण्याची गरज"च क्षीण करतात.हा निष्कामतेचा परमार्थ आहे.
७. लक्ष्मी की मोक्षलक्ष्मी?
सद्गुरु म्हणों लक्ष्मीवंत । तरी ते लक्ष्मी नाशिवंत ।
ज्याचे द्वारीं असे तिष्टत । मोक्षलक्ष्मी ॥२७॥
संपत्ती म्हणजे लक्ष्मी.
पण समर्थ लगेच म्हणतात–"ते लक्ष्मी नाशिवंत."
म्हणजे धन, वैभव, सत्ता, प्रतिष्ठा–हे सर्व परिवर्तनशील.
मग सद्गुरूंच्या दारी कोणती लक्ष्मी?"मोक्षलक्ष्मी."ही फार सुंदर संकल्पना आहे.



# महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

**विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२**

## वडील आणि मुलगी

स्वतः सासरी असूनही ती वडिलांचे खाणेपिणे, औषधपाणी आणि घराची सर्व व्यवस्था एका माऊलीच्या मायेने सांभाळते.
याचे सर्वात उत्तुंग आणि प्रेरक ऐतिहासिक उदाहरण म्हणजे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल आणि त्यांची कन्या मणिबेन पटेल!
सरदार पटेलांच्या पत्नी झवेरबा यांचे अकाली निधन झाले. त्यावेळी सरदार पटेल स्वातंत्र्यलढ्यात आणि देशसेवेच्या महायज्ञात अहोरात्र मग्न होते. अशा काळात त्यांच्या प्रकृतीकडे आणि दैनंदिन गरजांकडे लक्ष देणारे घरात कोणीही नव्हते. अनेकांनी आग्रह करूनही सरदारांनी दुसरे लग्न करण्यास ठाम नकार दिला.
अशा अत्यंत कसोटीच्या प्रसंगी त्यांची कन्या मणिबेन वडिलांच्या पाठीशी सावलीसारखी उभी राहिली! वडिलांची सेवा अखंड करता यावी आणि देशकार्यात त्यांना कोणतीही उणीव भासू नये म्हणून मणिबेन यांनी स्वतःच्या संसाराचा त्याग केला, आजीवन अविवाहित राहण्याचा कठोर वसा घेतला. सरदारांचे खाणेपिणे, साधे सुती कपडे धुण्यापासून ते औषधपाणी आणि देशव्यापी दौऱ्यांची व्यवस्था या सर्वांची काळजी मणिबेन यांनी साक्षात आईच्या ममतेने घेतली. कन्या असूनही त्या आपल्या राष्ट्रपुरुषाची माऊली झाल्या! वडील आणि मुलीच्या नात्यातील समर्पणाचे हे जगातील सर्वात वंदनीय रूप आहे.
मुलगी ही अशी स्नेहाची वेल असते, जी सासर आणि माहेर या दोन भिन्न वृक्षांना आपल्या अथांग प्रेमाने घट्ट जोडून ठेवते. संकटाच्या प्रसंगी बापाच्या खांद्याला खांदा लावून मानसिक धीर देणारी आणि उतारवयात वडिलांची काठी बनून त्यांना मायेची ऊब देणारी लेक ही प्रत्येक घराचे भाग्य असते.
नात्यांच्या या भरजरी 'महावस्त्रा'चा हा 'वडील-मुलगी' नावाचा पदर अथांग विश्वास, निस्वार्थ माया आणि त्यागाचा एक सोनेरी काठ आहे. हा पदर जेवढ्या कौतुकाने, अभिमानाने आणि आदराने जपला जाईल, तेवढे प्रत्येक पित्याचे आणि मुलीचे आयुष्य अधिक कृतार्थ आणि समृद्ध होत राहील!

# संस्थेच्या अमृत महोत्सवानिमित्त स्वा सावरकर शैक्षणिक संकुलात नवदांपत्य संमेलन संपन्न

ज्योतिर्मय साहित्य

बीड- भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित स्वा सावरकर शैक्षणिक संकुल बीड व माजी विद्यार्थी संघ वतीने बीड मध्ये भा.शि.प्र . संस्था अमृत महोत्सवी वर्ष निमित्त नवदांपत्य संमेलन २०२६ स्व गोपीनाथ मुंडे सभागृहात आयोजन करण्यात आले .

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. पी. के . कुलकर्णी (अध्यक्ष शैक्षणिक संकुल), मा श्री उमेश जगताप (विद्यासभा उपाध्यक्ष तथा उपमुख्याध्यापक) मा डॉ.श्री विवेक काटदरे (जेष्ठ विचारवंत), डॉ. अविनाश देशपांडे (कार्यवाह शैक्षणिक संकुल) मा श्री प्रमोदराव कुलकर्णी (अध्यक्ष माध्यमिक) जेष्ठ सहशिक्षिका श्रीमती सारिका सूर्यवंशीताई नवदांपत्य सौ राधिका सारडा व श्री कृष्णा सारडा यांची उपस्थिती होती .प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

प्रमुख मार्गदर्शक आदरणीय डॉ. विवेक काटदरे यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की सहजीवनाचा आनंद या विषयावर



भारतीय संस्कृतीत विवाह संस्कार असून कुंटूब हा समाजाचा आधार आहे.घर असावे घरासारखे नकोत नुसत्या भिंती तेथे असावी प्रेमळ नाती . घर हे आनंदाचे जिण होय .घरात आनंदी वातावरण असल पाहिजे . कुलदेवताची आराधना करावी . कुटुंबातील सदस्यानी सण उत्सव प्रसंगी एकत्र यावे .

कुटुंबातील सदस्यानी एकत्रित भोजन भ्रमण इ केले पाहिजे. कारण आपल्या सर्व धार्मिक विधीमध्ये आहे त्या प्रथा परंपरा रितीरिवाज यांचे पालन केले जाते .पती पत्नी यांच्या एकमेकांच्या सहवासातून विचारातून साधनेतून समाजाचा एक नवघटक निर्मितीत योगदान देवू शकतात. आपल मूल कसे असावे हे ठरवून बालकास जन्म देवू शकतात . प्रेम भावना ही आदर, क्षमा, उदार ,निस्वार्थ, विश्वास आध्यात्मिक इ. याचे प्रतिक आहे. पती पत्नी याच्यातील विश्वास हा वैवाहिक जीवन यशस्वीतेचा मार्ग होय. कुदुंब हे सदस्याची गरजा पूर्ण करण्याचे साधन आहे. आई वडील नवदांपत्य यांच्या वर्तनाचा प्रभाव नव जन्मनाऱ्या बालकावर होत असतो . कुटुंबातील सर्वांवर मनापासून प्रेम करा. प्रेमाने कार्य सिध्द होते .एकमेकाच्या साथीने वैवाहिक जीवन सफल होते. सदस्यावरील विशुद्ध प्रेम करा. कुटुंब ही संपत्ती आहे. नारी सन्मान भारतीय समाजात श्रेष्ठ आहे. शेवटी नाती ही दुसऱ्यावर नाही तर आपल्यावर अवलंबून असतात म्हणून कायम कुटुंबावर प्रेम करा मग पहा जग तुमचं आहे.

अध्यक्षीय समारोप डॉ. पी. के. कुलकर्णी यांनी भारतीय संस्कृतीत कुटुंब व्यवस्थेला अनन्यसाधारण महत्व आहे ती टिकवून ठेवण्याची जबाबदारी आपली आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी प्राथमिक च्या विदयार्थीनी यांनी नृत्याविष्कार आई जगदंबे या गीतावर सादर केला.

सूत्र संचालन सौ खंबायते ताई प्रास्ताविक सारिका सुर्यवंशीताई यांनी केले आभार प्रा संतोष जोशी यांनी केली. कार्यक्रमास बीड शहरातील नवदांपत्य, पालक संस्था पदाधिकारी शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते . नवदांपत्य संमेलन यशस्वी होण्यासाठी उपक्रम समिती प्रा संतोष जोशी श्रीमती खंबायते ताई, प्रा दीपाली लोहिया व सदस्यांनी प्रयत्न केले .शेवटी उपस्थित दाम्पत्याची प्रश्नमंजुषा स्पर्धा संपन्न झाली आणि विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.

# ज्ञानदा प्रतिष्ठानचा सौर विद्युत ऊर्जा प्रकल्प - दानशूर व्यक्तींच्या मदतीने साकार

ज्योतिर्मय साहित्य



पुणे - ज्ञानदा प्रतिष्ठानच्या वतीने सौर विद्युत ऊर्जा प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. हा प्रकल्प श्री. शशांक कुलकर्णी आणि श्री. मिलिंद दातार, पुणे यांच्या आर्थिक सहकार्यातून उभारण्यात आला आहे.

पर्यावरणपूरक आणि शाश्वत ऊर्जेचा वापर वाढवण्याच्या उद्देशाने हा सौर प्रकल्प सुरू करण्यात आला असून, त्यामुळे संस्थेच्या वीज गरजा भागवण्यास मोठी मदत होणार आहे. या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

या सहकार्याबद्दल ज्ञानदा प्रतिष्ठानने दोन्ही दानशूर व्यक्तींचे मनापासून आभार मानले असून, त्यांचे सुस्वागतम केले आहे.तसेच श्री विनायक जोशी यांनी त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

या उद्घाटन प्रसंगी श्री.मिलिंद दातार आणि सौ. दातार तसेच ज्ञानदा प्रतिष्ठान संस्थेचे कार्यवाह श्री मंदार शेंडे, सहकार्यवाह.सौ माणिक कुलकर्णी, कार्यकारणी सदस्य, श्री विनायक जोशी, श्री विवेक जोशी श्री. गोहाड सर मुख्याध्यापिका सौ.स्वाती कुलकर्णी, संस्थेच्या सौ. अमृता कुलकर्णी व सौ. स्नेहल बडवे हे उपस्थित होते. अशा सामाजिक आणि पर्यावरणपूरक कार्यातून समाजासमोर एक आदर्श निर्माण झाला आहे.

# रुप बदलते तत्व नाही...!!

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)



किती विरोधाभासी आणि भावस्पर्शी प्रेरणायुक्त परिवर्तित जीवन प्रणाली पण भौतिक स्वरुप जरी बदललं पण आत्मिक, अंतर्मनीची साद मात्र केवळ एकच, भक्तांविषयी असलेली आत्मियता एक आणि फक्त एकच, त्यामध्ये कोणताही दुजाभाव नाही. भाव तसा देव, असे म्हटल्या जातं पणं येथे तर साक्षात परमेश्वरच भक्तांविषयी उच्च कोटीचा भाव बाळगून आहे, त्या जाणिवेतूनच तो संतांचे मनातील अंतरंगी एक रुप झालेला आहे, अस्तित्व हिन होत भावविभोर होत भक्तांचे मन मंदिरी हृदय सागरात विरघळलेला आहे. किती ही दिव्य अनुभूती, कवियित्री आर्णा कचवे यांचे प्रतिभावंत सर्जनशील लेखनीतून अगदी उत्स्फूर्तपणे काव्यात उतरलेली आहे.

रुक्मिणी ती आजही आहे, सावली होऊन उभी

युग बदलते, वस्त्र बदलते, भाव तोच राहिला

आता साक्षात भगवंतच राजपाट सोडून भक्तासाठी वाळवंटी धाऊन आला मग सावली प्रमाणे पाठिशी असलेली असलेली देवी रुक्मिणी सुध्दा पावलांवर पाऊल टाकत येणारं, हे तर ओघाने आलेच. पती परमेश्वर सोबतीनं ती सुध्दा आनंदाने कमरेवर हात ठेवून उभी आहे. पण देवाने आपलं बाह्य रुप जरी बदलविलं तरी भक्ताप्रती असलेलं कर्तव्य, प्रेम आणि आस्था मध्ये यत्किंचितही फरक केला नाही. अर्जुन काय किंवा मध्ययुगीन संत मांदियाळी यांचे विषयी त्यांचे मनात समान आस्था आणि माया आहे. श्रेष्ठ आणि कनिष्ठ असा भेदभाव नाही. सर्वांना एकाच नजरेने बघण्याची या देवाची दिव्य दृष्टी अलौकिक आणि अनमोल भासते.

कृष्ण विठ्ठल एकच आहे, भेद नाही कोणताही

सावळा तो देव माझा, या हाकेला धावला

पुरातन काळी श्रीविष्णू अवतारी कृष्ण संकटात असलेल्या द्रोपदीचे हाकेला लज्जा रक्षणार्थ धावला. रणांगणावर पांडवांचे मदत केली. बालपणीचा गरिब मित्र सुदामा याचे सोबतही तीच निरपेक्ष, निस्पृह मैत्री निभावली. असा तो तेज:पुंज महा पराक्रमी गो वंश पालक द्वारकेचा राजा कलीयुगातही संतांचे हाकेला समाज प्रबोधन करण्यासाठी धावून आला. पौराणिक श्रीकृष्ण व मध्ययुगीन श्री विठ्ठल यांचे कालखंड जरी अलग अलग असले तरी रंगाने सावळा असलेला हा अवतारी देव एकच आहे. अनंत अनादी स्वरूपाचे देवत्व एकच तत्व आणि सत्व आहे.

कवियित्री आर्णा कचवे यांच्या प्रतिभासंपन्न शैलीतून साकारलेली ही कविता सर्जनशील विचार सरणीचा उत्कृष्ट नमुना आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे कवियित्री या अभियांत्रिकी शिक्षण घेत असून तंत्रज्ञाना सोबत आध्यात्मिक आणि वैचारिक क्षेत्रातही रुची बाळगून आहे. कमी वयात त्यांची प्रगल्भता खरोखरच कौतुकास्पद असून विचारचक्र फिरविण्यासाठी सक्षम दिसून येते. पौराणिक आणि कलीयुग किंबहूना मध्ययुगीन काळातील ईश्वराची विविध रुपांची तौलनिक अभ्यास करुन त्यानी साम्य शोधण्याचा प्रयत्न केला तो स्पृहणीय आहे. अपेक्षित असलेला भेद विरहित नित्कर्ष अगदी सहजच त्यांचे काव्यामधून प्रकट होतो. विविध घटना आणि प्रसंगावरून तो तर्कसंगत भासतो. अती सुंदर आणि अप्रतिम असलेली ही कविता वाचकांना भावनिक, आध्यात्मिक आणि हृदयस्पर्शी अशा एका वेगळ्याच भावविश्वात घेऊन जाते, हेच खरं. कवियित्री आर्णा कचवे यांचे अभिनंदन करुन पुढील काळात असल्याच प्रकारच्या आशयपूर्ण, दर्जात्मक आणि गुणवत्ता पूर्ण काव्यरचना निश्चितच पहायला मिळतील हीच श्री विठ्ठल चरणी प्रार्थना.

****






# "श्रीयश फार्मसीत 'आविष्कार २०२६' स्पर्धेचे यशस्वी आयोजन"

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर - श्रीयश इंस्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, छ. संभाजीनगर येथे नुकतीच 'आविष्कार २०२६' स्पर्धा यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत विविध शाखांतील विद्यार्थ्यांनी आपल्या नवकल्पना, संशोधन प्रकल्प आणि वैज्ञानिक कल्पनांची सादरीकरणे केली.

ज्युरी सदस्यांनी प्रत्येक प्रकल्पाचे मूल्यमापन केले आणि उत्कृष्ट प्रकल्पांना गौरविण्यात आले. डॉ. हुलास तोंडे, डॉ. मिलिंद कांबळे, डॉ. विशाल गुरुमुखी, श्री. साद सिद्दीकी, डॉ. दीपक कुलकर्णी, प्रा. अनिल पालवे, डॉ . सचिन ढवळे यांनी प्रकल्पाचे मूल्यमापन केले.

आविष्कार समन्वयक म्हणून प्रा. श्रीधर भोपळे यांनी जबाबदारी पार पाडली तसेच क्षेत्र प्रभारी म्हणून डॉ. दरक्षा शेख, प्रा. रश्मी शिवाजी तांबारे, प्रा. विनायक म्हैसमाळ यांनी तसेच मार्गदर्शक म्हणून सर्व शिक्षकांनी मुलांना प्रकल्प पूर्ण करण्यासाठी परिश्रम घेतले. महाविद्यालयाचे जीएस, सीएस तसेच स्वयंसेवक यांनी खूप मोलाची मदत केली."

या कार्यक्रमाचा यशाबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरुळे, मुख्य कार्यकारी अधिकारी कमांडर सतीश चौथनकर तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी, श्रीयश फार्मसीचे प्राचार्य डॉ. मंगेश घोडके शिक्षकवर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# कुटुंबप्रमुख हवा आहे! भाग ११: मनाच्या श्लोकांचा गाभा

ज्योतिर्मय साहित्य

दुसऱ्या दिवशी शनिवार असल्यामुळे श्रीराम आणि श्रुतकीर्ती यांची शाळा अर्ध्या दिवसाची होती. त्यामुळे दोघेही नेहमीपेक्षा लवकर घरी आले होते. त्यावेळी आजोबा दुपारची वामकुक्षी घेत होते. आजोबा झोपेतून केव्हा उठतात, याची दोन्ही मुले उत्सुकतेने वाट पाहत होती.

आजोबा बरोबर चार वाजता उठले आणि दिवाणखान्यात आले, तर मुले तिथे त्यांची वाट पाहत बसली होती.

"अरे मुलांनो, तुम्ही केव्हा आलात?" आजोबांनी विचारले.

"आज आमची शाळा अर्ध्या दिवसाची असते, आजोबा!" दोघेही एकदम म्हणाले.

"बरं, मी आधी चहा घेतो," आजोबा म्हणाले.

"अरे, मुलांनो, आजोबांना चहा तर घेऊ द्या!" पमेलाने मुलांना सांगितले.

"चहा घेता घेता सुरुवात करू या. काल रात्री आपण मनाच्या श्लोकांमधील महत्त्वाचे बारा श्लोक पाहायचे ठरवले होते," आजोबा म्हणाले.

"हो, आजोबा," श्रीराम म्हणाला.

"मामा, मलाही एक अडचण आहे," पमेला म्हणाली.

"अरेच्चा! पमेला, तुला आता कसली अडचण आली?" मामांनी आश्चर्याने विचारले.

"मी कुठेतरी 'आप्तवचन' असा शब्द वाचला. त्याचा सरळ अर्थ मला कळला. आप्तवचन म्हणजे आपल्या जवळच्या किंवा विश्वासातील माणसाने सांगितलेली गोष्ट, असा त्याचा अर्थ आहे ना?" पमेलाने विचारले.

"हो, सर्वसाधारणपणे तो अर्थ बरोबर आहे. पण भारतीय तत्त्वज्ञानाच्या संदर्भात या शब्दाला आणखी एक विशिष्ट अर्थ आहे," आजोबा म्हणाले.

"विशिष्ट अर्थ! मला वाटलेच की यामागे आणखी काहीतरी असेल," पमेला म्हणाली.

"हो. तो अर्थ समजून घेण्यासाठी आपल्याला भारतीय दर्शनशास्त्राकडे वळावे लागेल."

"दर्शनशास्त्र म्हणजे काय, मामा?" पमेलाने विचारले.

"दर्शनशास्त्र म्हणजे भारतीय तत्त्वज्ञानाच्या विविध परंपरा. त्यांपैकी न्यायदर्शनात 'आप्तवचन' या संकल्पनेचा विचार केला आहे."

"त्याचा आणि आप्तवचनाचा नेमका काय संबंध आहे, मामा?"

"तो आपण नंतर सविस्तर समजून घेऊ. आधी मुलांशी ठरल्याप्रमाणे बोलून घेऊ या," आजोबा म्हणाले.

"ठीक आहे. तुम्ही आधी मुलांशी तुमचा सुखसंवाद करा. नंतर मला न्यायदर्शन आणि आप्तवचन यांविषयी समजावून सांगा," पमेला म्हणाली.

"हो, आजोबा! तुम्ही आमच्यासाठी इतक्या लांब अमेरिकेत आला आहात. आईला नंतर समजावून सांगा," श्रीराम म्हणाला.

"ठीक आहे, मुलांनो. चला, आता आपल्या विषयाकडे वळू या," आजोबा म्हणाले.

लगेचच श्रीराम आजोबांच्या डाव्या बाजूला, तर श्रुतकीर्ती उजव्या बाजूला सोफ्यावर येऊन बसली.

"मुलांनो, समर्थ रामदासस्वामींच्या मनाच्या श्लोकांची एकूण संख्या २०५ आहे. त्यांपैकी आपण आज बारा महत्त्वाच्या श्लोकांच्या आधारे त्यांच्या शिकवणीचा गाभा समजून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. या श्लोकांतून भक्ती, सदाचार, मनोनिग्रह, सत्यनिष्ठा, विवेक, नम्रता, परोपकार, वैराग्य, सत्संग आणि आत्मज्ञान अशा अनेक विषयांची ओळख होईल," आजोबा म्हणाले.

मग आजोबांनी श्लोकांचे विवेचन सुरू केले.

१. भक्ती आणि सदाचार

मना सज्जना भक्तिपंथेचि जावे ।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे ।।
जनीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावे ।
जनीं वंद्य तें सर्व भावे करावे ।।




"मुलांनो, या श्लोकातून समर्थ आपल्याला चांगल्या मार्गाने जाण्याचा उपदेश करतात. मनाने भक्तीचा मार्ग स्वीकारावा. येथे भक्ती म्हणजे केवळ देवाची पूजा किंवा प्रार्थना नव्हे; तर चांगले विचार, चांगले आचरण आणि सद्गुण यांचाही त्यात समावेश होतो.

समाजात ज्या गोष्टी निंदनीय मानल्या जातात, त्या टाळाव्यात. त्याचप्रमाणे ज्या गोष्टी आदरणीय आणि अनुकरणीय आहेत, त्या मनापासून आचरणात आणाव्यात. खोटे बोलणे, दुसऱ्याला फसवणे, कुणाचे मन दुखावणे किंवा स्वार्थासाठी अयोग्य मार्ग स्वीकारणे यांपासून दूर राहावे. सत्य बोलणे, इतरांचा आदर करणे आणि शक्य असेल तेव्हा दुसऱ्याच्या उपयोगी पडणे, ही चांगल्या आचरणाची उदाहरणे आहेत.

आपले मन चांगल्या मार्गावर राहिले आणि आपले आचरणही त्या मार्गाला अनुरूप झाले, तर आपले जीवन अधिक सुंदर होऊ शकते," आजोबांनी समजावून सांगितले.

"आजोबा, आम्हीही चांगले वागण्याचा आणि कुणाला त्रास न देण्याचा प्रयत्न करू," श्रीराम म्हणाला.

"मीसुद्धा, आजोबा!" श्रुतकीर्तीने त्याला दुजोरा दिला.

"छान! आपण एखादी गोष्ट समजून घेतली, तर ती आपल्या वागण्यातही दिसली पाहिजे. आता पुढचा श्लोक पाहू या."

२. दैनंदिन जीवनातील सदाचार

प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।
पुढे वैखरी राम आधी वदावा ।।
सदाचार हा थोर सांडू नये तो ।
जनीं तोचि तो मानवी धन्य होतो ।।

"मुलांनो, या श्लोकात समर्थांनी दिवसाची सुरुवात ईश्वराच्या स्मरणाने करण्यास सांगितले आहे. सकाळी उठल्यावर मनात श्रीरामाचे स्मरण करावे आणि बोलण्याची सुरुवातही त्याच्या नामस्मरणाने करावी.

पण या श्लोकाचा अर्थ केवळ सकाळी देवाचे नाव घेण्यापुरता मर्यादित नाही. समर्थ सदाचाराचे महत्त्वही स्पष्ट करतात. चांगले आचरण हा जीवनाचा अविभाज्य भाग असावा. परिस्थिती कोणतीही असो, आपण योग्य तेच करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

उदाहरणार्थ, परीक्षेत कुणाची नक्कल न करणे, चूक झाली तर ती मान्य करणे, दिलेले वचन पाळणे, मोठ्यांचा आदर करणे आणि लहानांशी प्रेमाने वागणे, ही सदाचाराची साधी उदाहरणे आहेत. केवळ देवाचे नाव घेऊन उपयोग नाही; आपल्या वागण्यातही चांगुलपणा दिसला पाहिजे. जो माणूस सदाचाराने जगतो, त्याचे जीवन खऱ्या अर्थाने धन्य होते," आजोबा म्हणाले.

"आजोबा, मी उद्यापासून सकाळी उठल्यावर श्रीरामाचे स्मरण करीन आणि दिवसभर चांगले वागण्याचाही प्रयत्न करीन," श्रीराम म्हणाला.

"मीसुद्धा, आजोबा!" श्रुतकीर्ती म्हणाली.

"अरे वा! छान! एखादी चांगली गोष्ट आज समजली, तर तिचा सराव उद्यापासून नव्हे, तर आजपासूनच सुरू करता येतो," आजोबा हसत म्हणाले.

"आता तुम्ही दोघे थोडा वेळ खेळून या," पमेला म्हणाली.

"ठीक आहे, आजोबा," श्रीराम म्हणाला.

दोघेही उठून खेळायला निघाले. जाता जाता श्रीराम पुन्हा वळून म्हणाला, "आजोबा, उद्या रविवार असल्यामुळे शाळेला सुट्टी आहे. मग उद्या उरलेले श्लोकही सांगाल ना?"

"हो, आपण प्रयत्न करू या," आजोबा म्हणाले.

"मुलांनो, आता खेळायला जा. आजोबांना थोडा आरामही करू द्या," पमेला हसत म्हणाली.

क्रमशः भाग १२ - मनाच्या श्लोकांतून जीवनदर्शन

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559


































दसरा सोने . ..

दस-यांस स्वर्णखरेदी
ही परंपरागत कावड
बावनकशी रे शुध्दत्व
करी चोखंदळ निवड

निमित्ताने बचतभली
आपसूक होई आवड
स्व धन आपले कामी
असेल जेधवा निकड

हरेक जण घेतो सोने
स्थितीअसून अवघड
भावभिडले गगनाला
ऊरात किती धड धड

मुहूर्त नको टाळायला
कशी केवढी धड पड
केलीचं पाहिजे खरेदी
असो भावजरी वरचढ

फायदाघेतातव्यापारी
कळेना कुणा लफ्फड
तिजोरी भरेसोनारांची
बजेट वाजते खडखड

कुणी म्हणेल सोने हे
तिजोरी बंदिस्त दगड
गुंतवून ठेवावी लक्ष्मी
कमाई ज्याला रगड

सुवर्ण मध्य साधा नीट
जेवढी आपली निकड
अंथरूण पाहूनि पाय
असे मुहूर्त जरी धाकड

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६



रणचंड्या .

दुर्बळतेची प्रतिमा
नाही मुळी बांगड्या
टक्कर देती महिला
पुरुषांनाही रांगड्या

पुरुषांच्या बरोबरीने
ढाली उभ्या तगड्या
ज्योतीसम कधी त्या
धग धगत्या शेगड्या

शक्तीदुर्गा महाकाली
महाशक्ती रणचंड्या
डोक्यातभरुनि खुळ
आम्ही पिकवे कंड्या

नारीलाआत्मसन्मान
नको उगाचं कुबड्या
उभे रहायचे स क्षम
लक्षात घे तू बबड्या

धगधगत्याअग्नीकुंडा
घेतल्या किती उड्या
एकविसाव्या शतकी
खुळा भेदाभेद वेड्या

इतिहासात नोंदसाक्ष
विशेषत्व नारी लढ्या
भक्कम भिंती हादरी
निखळे तुरूंग कड्या

पुरुषासोबत सक्षमते
वनितासज्जते खड्या
ओळखले कमी वेळा
लखलखहि-याखड्या












# ''संस्थेचा साधेपणा आणि विनम्रता हीच खरी ओळख''-प्रा. मुनीष शर्मा





**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - ग्रामोद्योगिक शिक्षण मंडळाचा (जी. एस. मंडळ) ५१ वा वर्धापनदिन एमआयटीच्या ''आनंद'' सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेच्या ५१ वर्षांच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेण्यात आला. संस्थेचे पदाधिकारी, विश्वस्त, प्राध्यापक, विभागप्रमुख आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रसिद्ध लेखक व पत्रकार श्री. दत्ता जोशी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी जी. एस. मंडळाचे अध्यक्ष डॉ. यज्ञवीर कवडे यांच्या मेहनतीच्या आणि संघर्षपूर्ण प्रवासाचे कौतुक केले. तसेच संस्थेच्या प्रगतीमागील सातत्यपूर्ण प्रयत्नांचे महत्त्व अधोरेखित केले.

जी. एस. मंडळाचे सरचिटणीस प्रा. मुनीष शर्मा यांनी आपल्या मनोगतात बदलत्या जीवनशैलीविषयी भाष्य केले. ते म्हणाले, ''आजच्या वेगाने बदलणाऱ्या जीवनात नाती आणि जीवनमूल्ये यांसारख्या महत्त्वाच्या गोष्टी आपण हरवत चाललो आहोत. आज आपण प्रगतीची फळे चाखत आहोत; मात्र आपल्या मुळांना विसरता कामा नये. या संस्थेची मला सर्वाधिक आवडणारी वैशिष्ट्ये म्हणजे साधेपणा आणि विनम्रता. आपण कमी बोलून अधिक काम केले पाहिजे. या संस्थेतील प्रत्येक विद्यार्थी आणि कर्मचारी संस्थेचा अभिमान बाळगतो, ही आनंदाची बाब आहे.'' जी. एस. मंडळाच्या यशस्वी वाटचालीसाठी त्यांनी सर्व कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी प्रा. डॉ. बाबासाहेब सोनवणे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत डॉ. यज्ञवीर कवडे यांच्या मेहनतीच्या आणि यशस्वी प्रवासाचे ध्वनीमुद्रण उपस्थितांसमोर प्रस्तुत केले. त्यांच्या कार्यातून मिळणारी प्रेरणा आणि संस्थेच्या विकासातील योगदान यांचा त्यांनी गौरव केला.

१९७५ मध्ये स्थापन झालेल्या ग्रामोद्योगिक शिक्षण मंडळाने गेल्या ५१ वर्षांत तांत्रिक, व्यावसायिक आणि उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय वाटचाल केली आहे. संस्थेच्या प्रमुख शैक्षणिक संस्थांपैकी एक असलेल्या मराठवाडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने (एमआयटी) अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शिक्षणासोबत संशोधन, नवोपक्रम, कौशल्यविकास आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देण्याची परंपरा जोपासली आहे.

या कार्यक्रमाला जी. एस. मंडळाचे अध्यक्ष डॉ. यज्ञवीर कवडे , संचालक डॉ. शकुंतला लोमटे, सरचिटणीस प्रा. मुनीष शर्मा, श्री. दत्ता जोशी, एमआयटीचे संचालक डॉ. भालचंद्र वायकर , संचालक प्रा. डॉ. निलेश ग. पाटील, कार्यकारी संचालक डॉ. संतोष भोसले, प्राचार्य डॉ. सुनील देशमुख, डॉ. महेंद्र कोंडेकर, प्राचार्य एम. आर. वैद्य, संचालक डॉ. संदीप पानकडे, अधिष्ठाता डॉ. भालचंद्र रेगुलवार, डॉ अशोक केचे, प्रबंधक डॉ गणेश साबळे, प्राचार्य डॉ. प्रभु कोडेस्वरा , प्राचार्य डॉ. शैलेंद्र कटके, प्रा. एम. ए. पाटील यांच्यासह सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख आणि एमआयटीचे प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या वाटचालीसाठी ज्या ज्या लोकांनी मदत केली त्यांच्याबद्दल आदराची भावना व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि संचलन प्रा अरविंद नागरिक यांनी केले तर प्रा एस एम बडवे यांनी केले.

# भेलके महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

## एक तास वाचनाचा उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शंकरराव भेलके महाविद्यालय येथे वाचन प्रेरणा दिन अत्यंत उत्साहात आणि विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजविणे आणि वाचनाची आवड निर्माण करणे या उद्देशाने महाविद्यालयात एक तास वाचनाचा विशेष उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. एक तास वाचनाचा या वेळेत विद्यार्थ्यांनी विविध कथा, कादंबऱ्या, महान व्यक्तींची चरित्रे आणि इतर अवांतर वाचनाच्या पुस्तकांचे तल्लीन होऊन वाचन केले.



हा उपक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. जगदीश शेवते यांनी वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व विशद करत कार्यक्रमाची सविस्तर रूपरेषा उपस्थितांसमोर मांडली.

उपक्रमाचे यशस्वी आयोजन महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. भगवान गावित, मराठी विभाग प्रमुख डॉ. जगदीश शेवते, तसेच सुमित कांबळे व अभिषेक मोरे यांनी केले.

या प्रसंगी महाविद्यालयातील विविध विभागांचे प्राध्यापक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये प्रा. दत्तात्रय घोडके, डॉ. सचिन घाडगे, प्रा. जीवन गायकवाड, प्रा. माऊलीची कोंडे, प्रा. वैष्णवी कोंडे, प्रा. दयानंद जाधवर (वाघिरे महाविद्यालय, सासवड) कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडल्यानंतर उपस्थितांचे व विद्यार्थ्यांचे आभार महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. भगवान गावित यांनी मानले. या उपक्रमामुळे महाविद्यालयाच्या परिसरात एक प्रगल्भ साहित्यिक आणि वाचनस्नेही वातावरण निर्माण झाले होते.

# बा. भो. शास्त्री यांच्या मार्गस्थ : भाग तिसरा आत्मचरित्राचे महाक्षेत्र डोमेग्राममध्ये प्रकाशन

**ज्योतिर्मय साहित्य**

श्रीरामपूर : महानुभाव पंथाचे ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत आणि संशोधक बा. भो. शास्त्री लिखित बहुचर्चित आत्मचरित्र मार्गस्थ : भाग तिसरा या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा श्रीरामपूर तालुक्यातील महाक्षेत्र डोमेग्राम येथील ऐतिहासिक राजमठात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या प्रकाशन सोहळ्यासाठी अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे अध्यक्ष, कवीश्वर कुलाचार्य, आचार्य प्रवर, महंत श्रीविद्वांस बाबा यांच्या हस्ते ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. त्यांच्या हस्ते प्रकाशन होणे हा बा. भो. शास्त्री यांच्या साहित्यिक कार्याचा गौरव असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

या प्रसंगी मंचावर महानुभाव पंथाचे थोर अभ्यासक साहित्याचार्य संतोषमुनी शास्त्री, सामाजिक कार्यकर्ते राजूदादा सातारकर, जेष्ठ साहित्यिक, अभ्यासक धनंजय लोणारकर तसेच प्रकाशक विलास फुटाणे उपस्थित होते.

महंत विद्वांस यांचे उद्गार

याप्रसंगी महंत विद्वांस बाबा बा. भो. शास्त्री यांच्या कार्याचा आढावा घेतना म्हणाले, बा. भो. शास्त्री यांनी आपले संपूर्ण आयुष्य महानुभाव साहित्याच्या सेवेसाठी, संशोधनासाठी आणि संवर्धनासाठी वेचले आहे. आधुनिक महाराष्ट्राला महानुभाव पंथाचे साहित्य वैभव, वैचारिक वैभव आणि सामाजिक तत्वज्ञान समजावून सांगण्याचे महान कार्य त्यांनी आपल्या लेखणीतून केले आहे. त्यांचे लिखाण हे केवळ साहित्य नसून, एक सामाजिक दस्तऐवज आहे.

महंत पुढे म्हणाले, एक कटू सत्य सांगावेसे वाटते, महानुभाव पंथाने बा. भो. शास्त्री यांना पाहिजे तेवढी प्रतिष्ठा, पाहिजे तेवढा सन्मान कदाचित दिला नाही. मात्र, बा. भो. शास्त्री यांनी मात्र महानुभाव पंथाला संपूर्ण महाराष्ट्रात एक वेगळी सामाजिक प्रतिष्ठा, ओळख मिळवून दिली आहे. त्यामुळे संपूर्ण महानुभाव पंथ त्यांचा सदैव ऋणी राहील. उद्या जर महानुभाव पंथाचा खरा इतिहास लिहायचा झाला तर त्या इतिहासात सर्वात जास्त पाने ही बा. भो. शास्त्री यांच्या कार्याची आणि त्यांच्या साहित्याची असतील.

साहित्याचार्य संतोषमुनी शास्त्री



म्हणाले, मार्गस्थ हा ग्रंथ केवळ बा. भो. शास्त्री यांचे आत्मचरित्र नसून, तो महानुभाव साहित्याचा गेल्या पन्नास वर्षांचा जिवंत इतिहास आहे. त्यांनी भोगलेले कष्ट, केलेला संघर्ष आणि टिकवलेली निष्ठा, ही आजच्या तरुण साहित्यिकांसाठी प्रेरणादायी आहे.

प्रकाशक विलास फुटाणे म्हणाले, बा. भो. शास्त्री यांचे साहित्य हे अत्यंत अभ्यासपूर्ण, संदर्भपूर्ण आणि संशोधकांसाठी मार्गदर्शक आहे. त्यांचे मार्गस्थ चे तिन्ही भाग वाचकांनी डोक्यावर घेतले आहेत. त्यांचे पुढील साहित्य प्रकाशित करण्याची संधी आम्हाला मिळणे, हे आमचे भाग्यच आहे. राजूदादा सातारकर, कपाटे आणि धनंजय लोणारकर यांनीही आपल्या भाषणातून शास्त्री यांच्या साहित्यिक योगदानाचा गौरव केला आणि त्यांना पुढील लेखनासाठी शुभेच्छा दिल्या.

शास्त्रींचे मनोगत

बा. भो. शास्त्री यांनी आपल्या साहित्यिक प्रवासातील आठवणींना उजाळा दिला. या ग्रंथ लेखनामागील प्रेरणा, आलेले अडथळे आणि मिळालेले सहकार्य, याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. या प्रसंगी परिसरातील श्रोते, भाविक, अभ्यासक आणि साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चुलीपासून चुलीतल्या ज्वाळापर्यंत...

**ज्योतिर्मय साहित्य**

काल सहज विसावलेल्या त्या निवांत वेळी गैलरीत उभी होते. अन् लक्ष गेले ते नुकत्याच फुटू लागलेल्या कुंडीतल्या तुळशी कडे अन् हरवलेल्या क्षणी मनाच्या पोकळीत एक जाणीव झाली. नि नयनातून मोती बनून घरंगळून गेली.

आज मी कुठे.. कशी... अन् ओठावर आले,

थेंबा थेंबात एक आस

शोधत राहते मृगजळातले भास

त्या एका थेंबात किती सार जग सामावलेल असते हो ना!! का कोण जाणे पण तो एक थेंब ओघळताना गालावर एक प्रश्न चिन्हं उमटवून गेलं,

का?काय? किती ?कसे? कुठे? कुणाला? कोणी? असे कितीतरी प्रश्न च प्रश्न....

प्रश्नाची उकल होता होता,

खूप दिवसापासून एक वाक्य उद्विग्न करत होत,

तुमची अक्कल ठेवा, तुमच्यापर्यंत, न तुमच्या चुलीपर्यंत.

चूल आणि मूल चूल आणि मूल यांचं नी स्त्रीचं नात तस खूप जून म्हणावे लागेल. पण याच

चुलीच्या प्रकाशातूनच प्रकाशाची कवाडे तिने शोधून काढली. चुलीतल्या त्या राखेखाली कधी कधी धगधगता निखारा ही असतो.

कधीतरी कुठेतरी तुमची अक्कल ठेवा तुमच्यापर्यंत न तुमच्या चुलीपर्यंत अस ऐकल. चुलीतल्या ज्वालांचा जिथपर्यंत उजेड पडतो तिथं पर्यंत तुमचं विश्व. असंही ऐकण्यात आले होते. पण मग हेच विश्व जेव्हा त्या धगधगत्या ज्वालात उडी घेऊन सती जातांना केवढे होते, किंवा मग आई होताना त्या धगधगत्या ज्वालांच पाणी होऊन घरंघळताना केवढे असत, याचं उत्तर सापडेल!

लहानपणी एक गोष्टीचं पुस्तक वाचले होते. राजपुत्र ठकसेन एक राजा एक राणी वगैरे वगैरे.. राजा अगदी प्रजा दक्ष मनमिळावू प्रजेची खूप काळजी घ्यायचा.. कांचन नगरी सुखात नहात होती वगेरे... एक दिवस राजा राणी बोलत असताना माझ चरित्र खूप गहन आहे.असे विक्रमादित्य बोलला, त्यावर कांचन माला म्हणाली नाही,स्त्री चरित्र खूप गहन आहे. त्यावर राजाने तिला सिद्ध करण्यास सांगितले. आणि कांचन माला ने ते सिद्ध करून दाखविले अर्थात ती कथा होती. पण तेव्हाच मनाला द्वंद्वात टाकले.

वेलिवरची एक कळी कळीच हळू हळू फुलताना सूर्य प्रकाश, चांदणे आणि गगाना एवढा आनंद त्यात सामावताना, जेव्हा त्या फ ुलाचे बीज पुन्हा एकदा अंकुर ताना, केवढे असते. हा मला पडलेला प्रश्न? जास्त काही नाही पण सावित्री पतीचे प्राण परत आणताना म्हणजे कथा आहे,कितपत खरी किंवा खोटी माहिती नाही, पण विचाराची चक्रे वैशिष्ट्यात हरवतात.

पूर्वी सावित्री कुठपर्यंत गेली असेल ,आणि कशी? माहीत नाही, ठीक आहे, पण आत्ता कल्पना चावला तर गेली ना,मग तिचं विश्व केवढ म्हणावं.

आ म्हणजे आत्मा नी ई म्हणजे ईश्वर उघडलेल्या ओठात आत्मा मिटता ओठ ई म्हणजे संपूर्ण आईमध्ये संपूर्ण विश्व व्यापलेय. असे आपण म्हणतो मानतो.

हे सारं आहेच एक उदाहरण म्हणून फक्त सासरचे लोक म्हणतात, तुझ माहेर असं, नी माहेरची म्हणतात तुझ सासर असं, या सासर माहेर मध्ये अडकलेली ती अर्थातच मुलगी, बहिण, आत्या



मावशी, नणंद, सून, आई, सासू ,आजी कितीतरी गोष्टीत व्यापणारी ती, तीच विश्व चुलीपर्यंतचच का?

सासरी आल्यानंतर शारीरिक मानसिक, आणि भावनिक दृष्ट्या चुलीतल्या ज्वाला सारखे सार काही स्वतः त सामावून काजली झटकून जळत राहते. कुठले मोठे मोठे शब्द महान वगेरे वापरायचे नाहीत.पण त्यात ही काहीतरी तथ्य... या प्रश्नात हरवू जायला होते. या पुढचे

आई माझा गुरु, आई कल्पतरु, इच्छित वस्तू देणाऱ्या झाडाला कल्पतरु म्हणतात... कल्पतरूचे झाडं म्हणे स्वर्गात असते. अतिशयोक्ती होतेय माफी असावी, पण कल्पतरूंचे झाडं म्हणजे इच्छीलेली वस्तू देणारे झाड ना, अन ते झाड म्हणजे त्याच्या सारासार विचार केला तर नजरेसमोर आई उभी राहते. प्रेम माया ममता

वास्तल्य यात व्यापलेली ती

तिची अक्कल चुलीपर्यंतच..?

हरहर महादेव, जय भवानी हे शब्द सह्याद्रीच्या कड्या कपारीतून नदी नदीच्या पात्रातून गेली ४०० वर्षांपासून घुमते आहे.

समतेची स्वातंत्र्याची पहाट आज नवनवीन पानामध्ये फुलांमध्ये



सौ.वैशाली चंद्रकांत महाडिक.
श्री क्षेत्र निनाम-सातारा
सं. क्र.-९७६७४३७९२३

फुलते आहे, ती एक स्त्रीचं होती.

क्रांतीची ज्योत आज अजून अखंड तेवत आहे. तिचा प्रकाश पृथ्वीपासून चंद्रापर्यंत जाऊन पोहचलाय. ती क्रांती ज्योती होती.

आता होते भुईवर, गेलं गेलं आभायात,ते मन ही...

मातीतल्या मातीत मिसळून जाताना, आऊसाहेब जिजाऊ, सावित्री माई, बहिणाबाई अशी अनेक नावे नव्या प्रेरणेने माझ्यातल्या मला जागे करतात. म्हणजे मी स्वतःला खूप महान वगैरे नाही समजत.पण तेव्हा पुन्हा ती चे व्यापलेलं हे भल मोठं विश्व पुन्हा त्याच वाटेवर जाऊन तिचं विश्व नजरेसमोर येते.

सहन शिलतेच्या वाटेवर मखमली फुलांचा गालिचा अंथरताना मायेच्या थेंब थेंबात मृदेला ओलचिंब नी मृदगंध दर वळण्यासाठी आकाशातून स्वतः कोसळून अवणीची गळाभेट घेते,आणि मातीतल्या त्या मातीत विरून... पुन्हा मातीशी एकरूप होऊन पुन्हा एकदा अंकुरताना, मातीतल्या त्या मातीचे नाते सांगताना तिचे विश्व पुन्हा समोर येते.

मातीत विरून... वास्तल्याच्या झऱ्यातून थेंब थेंब पाझरताना हे विश्व शब्दात व्यापताना शब्दांनाही कोडं... !!

एक नमूद करावस वाट तेय एका क्षणात एक नाव सोडून दुसऱ्या नाव आणि त्या नावाबरोबर आलेली सगळी नाती स्विकारुन त्या साऱ्यात स्वतःला सामावून घेताना घरात स्वतःचे अस्तित्व निर्माण करणारी तीच अस्तित्व चुलीपर्यंत का म्हणावं. पार्वती, लक्ष्मी, सरस्वती, सीतामाई, जनाई, गार्गी, मैत्रेयी, रमा ते आत्ताच्या शिवण्या, लावण्या, परी इथपर्यंत खूप खूप नावे आहेत.

चुलीवरच्या भाकरीतला चंद्र कि चंद्रावरच्या भाकरीचा प्रवास अन चुलीतली राखेमध्ये नाव कोरता कोरता काळा टिक्का कपाळी मिरवता मिरवता चंद्रावरच्या मातीत सुरेख अक्षरात कोरलेलं नाव नी चंद्रावरच्या मातीच्या टिळ्यात अभिमानाचं कोंदण दिसतय. पण तिच्यातल्या माणूसपणासाठीचं माणूसपण आज गारठलयं असे वाटत राहते.

कितीतरी अग्निदिव्य करायला स्त्री कधीही कचरली नाही. नाही पूर्वी ना ही आत्ताही, कितीतरी अग्निदिव्य पार करत तिचा प्रवास अव्याहतपणे चालू असतो.तरीही डगमगत नाही .

मराठीतले समास अंलकार प्रयोग कविता बेरीज वजाबाकी करता करता बाकी किती येणारं हे माहीत असूनही वेगवेगळ्या सूत्रांनी गणिताची उकल करत असते. वेगळ्यावेगळी सूत्रे समीकरण लावून ती आयुष्याची गणित सोडवत आली. इतिहास तर केव्हाचा काबीज केला, पृथ्वीपासून आकाशापर्यंतचा प्रवास करत भूगोलात ही केव्हाचीच सामावली.

असे माझे मत आहे. पण कुठेतरी ट्रू किंवा फॉल्स असूच शकते, माणूस आहे.

सुर्योदय ते सूर्यास्त मराठी इतिहास भूगोल गणित इंग्लिश विज्ञान पानाफुलात मातीत साऱ्या गोष्टीत ती सामावलेली आहे.मग कसं म्हणता येईल कि तुमची अक्कल चुलीपर्यंतच.किंवा त्या ज्वालांच्या उजेडापर्यंतच...

आज अनेक असे प्रेरणादायी चेहरे नजरेसमोर आहेत. लिहायला खूप काही आहे. तिच अस्तित्व काही शब्दात मांडयचा हा एक छोटासा प्रयत्न अगदी छोटासा म्हणजे... जे अयोग्य ते माझे. एखादी दूरात धावणारी पायवाट आहे ,आणि त्या पायवाटेवर चालण्यासाठी उचललेलं पहिलच पाऊल. वाटेवर फुलं उमलतील कि... माहित नाही पण माहित नाही म्हणून मनाच्या कडेला लावलेल्या रोपांना पाणीच द्यायचे नाही असे तर नाही ना!म्हणूनच हा छोटासा केविलवाना प्रयत्न... माणूस म्हणून मनाच्या आरशात प्रतिबिंब दिसते पण अस्पष्ट, धूसर तिच्यातली ती खूप दूरच्या पायवाटेवर अंधूक धुक्यात हरवलेल्या सावल्यात हरवलेली असते. अंगणातल्या तुळशीची सावट निरांजनाच्या मंद मंद प्रकाशात गगनापर्यंत दिसते. पण... कुठेतरी हिरवी पाने आणि काड्याकाड्यात वाळलेली दिसते. असे वाटते अथांग पसरलेल्या वाळवंटात कुठेतरी कोरडया डोळ्यात थोडासा मायेचा ओलावा शोधत राहते, तिच्यातली ती अचानक मनाच्या आरशात नजरेसमोर आली. अन ती शब्दांनी शब्दांमध्ये गुंफली.

तिच्यातल्या ती ला शोधून तिला मायेच्या झऱ्यातून पाझरणाऱ्या मायेच्या पांढऱ्याशुभ्र अश्रूंच्या मोत्याची माळ वास्तल्याच् कोंदणात प्रेमाच्या कधीही न तुटणाऱ्या धाग्यात गुंफलेल्या मालेने तिच्यातल्या तिला शोधून प्रेम माया ममतारुपी हार असा आगळा वेगळा अनोखा सत्कार होताना मन ओलेचिंब झाले. नि ओठावर आले, थेंब थेंबात एक आस, शोधित राहते मृगजळातले भास.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559